। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २४६ वा । शनिवार दिनांक १३ डिसेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## सशस्त्र सेना ध्वज दिन निधी संकलन शुभारंभ

# देशासाठी लढणाऱ्या सैनिकांच्या प्रश्नांची सोडवणूक करणे हे आद्य कर्तव्य–जिल्हाधिकारी कीर्ती किरण पूजार





धाराशिव दि.११ डिसेंबर (जिमाका) देशाची सुरक्षितता ही सैनिकांच्या हाती आहे. सैनिक हे देशाच्या सुरक्षेसाठी अहोरात्र काम करत असतात.कुटुंबासाठी कमी आणि देशासाठी जास्त वेळ देत असतात.त्यामुळे देशासाठी लढणाऱ्या सैनिकांच्या प्रश्नांची सोडवणूक करणे हे आद्य कर्तव्य आहे.असे प्रतिपादन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन समिती सभागृह येथे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या वतीने आयोजित सशस्त्र सेना ध्वजदिन २०२५ निधी संकलन शुभारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून श्री.पुजार बोलत होते.यावेळी मंचावर अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील,जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव न्या.भाग्यश्री पाटील, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळे,निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, पोलीस उपाधीक्षक (गृह) डी.पी.पारेकर, जिल्हा कोषागार अधिकारी अर्चना नरवडे, एसटीचे विभाग नियंत्रक अजय पाटील व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले.कर्नल शरद पांढरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री पुजार पुढे म्हणाले की,ध्वज दिन निधी संकलनातून सैनिक व त्यांच्या कुटुंबांना मदत करणे हे आपले कर्तव्य आहे.सर्वांच्या सहकार्याने जास्तीत जास्त ध्वजदिन निधी संकलित करणार असल्याची ग्वाही देऊन श्री.पुजार म्हणाले की,भारतीय प्रशासकीय सेवेत आल्यानंतर प्रशिक्षणादरम्यान आम्ही काही अधिकारी जम्मू-काश्मीरमधील पूंछ जिल्ह्यात पाकिस्तानच्या सीमेवर दहा दिवस सैनिकांसोबत होतो.त्यांचे जीवन अगदी जवळून बघितले.उणे तापमानात राहून ते देशाचे संरक्षण करतात असे त्यांनी सांगितले. श्रीमती.ज्योती पाटील म्हणाल्या की, देशासाठी लढणाऱ्या सैनिकांच्या समस्या सोडविण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे.जिल्ह्यातील ज्या सैनिकांना जमिनी देण्याचा प्रश्न आहे,तो लवकरच सोडविण्यात येईल.तसेच त्यांच्या अन्य समस्यांचे देखील निराकरण करण्यात येईल. शासनाच्या विविध योजना आहेत,त्या योजनांचा लाभ जिल्ह्यातील सैनिकांनी, माजी सैनिकांनी व त्यांच्या पाल्यांनी घेतला पाहिजे असे त्या म्हणाल्या.

न्या.श्रीमती भाग्यश्री पाटील म्हणाल्या, जिल्ह्यातील सैनिकांचे प्रश्न जिल्हा विधी सेवा प्राधिकरणकडून सोडवण्यात येतील. सैनिकांनी देशासाठी त्याग करून मातृभूमीचे रक्षण केले आहे.अतिशय दुर्गम भागात जीव संकटात टाकून सैनिक हे देशाची सेवा करतात असे त्यांनी सांगितले.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. जिल्ह्यातील शहीद जवानांच्या फोटोला व अमर जवान प्रतिमेला पुष्पचक्र अर्पण केली.शहीद जवानांना बिगूल वाजवून व उपस्थितांनी उभे राहून मानवंदना दिली. वीर पत्नी श्रीमती प्रभावती निकम, श्रीमती रहना बेगम,श्रीमती संगीता सावंत,श्रीमती लक्ष्मीबाई गायकवाड श्रीमती कांताबाई कदम,वीरमाता श्रीमती माताबाई नागरगोजे,वीर बंधू दिलीप बनसोडे व शिवाजी कोळपे यांचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी केल्याबद्दल जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव न्या.श्रीमती भाग्यश्री पाटील,सहायक पोलीस उपनिरीक्षक निरीक्षक अश्विनी जाधव,अधिकार मित्र अशोक गाडेकर,सैनिक कल्याण विभागाचे गुरुनाथ कुलकर्णी,अनिल मलशेट्टी यांचा तर उत्कृष्ट ध्वज दिन निधी संकलनाबद्दल गटशिक्षणाधिकारी उमरगा,कळंब,भूम,लोहारा,वाशी, जिल्हा सामान्य रुग्णालय,जिल्हा आरोग्य विभाग,राज्य परिवहन महामंडळ,श्रीपतराव भोसले हायस्कूल,उपप्रादेशिक परिवहन विभाग,जिल्हा हिवताप अधिकारी, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धाराशिव यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह,प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

माजी सैनिक पाल्य ज्ञानेश्वर मोरे याला २० हजार रुपयांचा धनादेश, दहावीमध्ये उत्तम गुण प्राप्त केल्याबद्दल आर्या कुलकर्णी,आदित्य वाघ याला एमबीबीएसमध्ये प्रवेश मिळाल्याबद्दल ७५ हजार रुपयांचा धनादेश व आर्मी ट्रेनिंग गया येथे निवड झाल्याबद्दल हरिकेश गाडेकर यांचा देखील मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

मागील वर्षी सशस्त्र सेना ध्वज दिन निधी संकलित करण्याचे ५७ लक्ष रुपयांचे उद्दिष्ट दिले असता १ कोटी ३४ लाख ८४ हजार रुपये निधी संकलित करून राज्यात तिसरा क्रमांक प्राप्त केला.यावर्षी देखील सन २०२५ चे ५७ लक्ष रुपये निधी संकलनाचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानकडून ध्वज दिन निधी संकलनासाठी १० लक्ष रुपयांचा निधी देण्यात आला.हा धनादेश मंदिर संस्थानचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले.कर्नल श्री.पांढरे यांच्याकडे सुपूर्द केला.

कार्यक्रमात सचिन ढेपे,चंद्रकांत गुंड व रेखा सोनटक्के यांनी सुरेख देशभक्ती गीतांचे सादरीकरण केल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.कार्यक्रमाचे संचालन व उपस्थितांचे आभार विशाल सूर्यवंशी यांनी मानले.कार्यक्रमाला वीर पत्नी, वीर माता,माजी सैनिक व त्यांचे कुटुंबीय,एन.एन.सीचे विद्यार्थी तसेच विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने झाला.

# मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण योजना: ३१ डिसेंबरपर्यंत ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन

धाराशिव दि.१२ डिसेंबर (जिमाका) मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण या योजनेअंतर्गत लाभार्थी महिलांपैकी ज्यांचे वडील हयात नाहीत,पती हयात नाहीत किंवा ज्यांचा घटस्फोट झालेला आहे,अशा सर्व पात्र महिलांनी स्वत:चे ई-केवायसी करणे आवश्यक आहे. ई-केवायसीनंतर पती अथवा वडील यांचे अधिकृत मृत्यू प्रमाणपत्र, घटस्फोट प्रमाणपत्र किंवा न्यायालयाचे आदेश यांची सत्यप्रत संबंधित अंगणवाडी सेविकेकडे ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत जमा करावयाची आहे.

ही प्रक्रिया ऑफलाईन पद्धतीने करावयाची आहे.तसेच,या योजनेच्या https://ladakibahin.maharashtra.gov.in या वेब पोर्टलवरील ई-केवायसी प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने अंतिम करणे आवश्यक असल्यामुळे पोर्टलवर आवश्यक त्या सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.त्यानुषंगाने जिल्ह्यातील पात्र लाभार्थी महिलांनी सदर वेब पोर्टलवर भेट देऊन ई-केवायसी प्रक्रिया ऑनलाईन पूर्ण करावी.

ज्या पात्र लाभार्थी महिलांनी पूर्वी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली आहे आणि पर्याय निवडताना काही चुका झाल्या आहेत,अशा लाभार्थ्यांसाठी एक अंतिम संधी (One Time Edit Option) उपलब्ध करून देण्यात आली आहे. ही संधी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंतच उपलब्ध राहणार आहे. त्यानंतर कोणताही बदल करण्याची सुविधा मिळणार नाही. त्यामुळे ई-केवायसीमध्ये सर्व माहिती अचूक भरावी, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, धाराशिव यांनी केले आहे.

# ब्राह्मण कल्याण ट्रस्टच्या वतीने १४ डिसेबर रोजी सन्मान सोहळ्याचे आयोजन

धाराशिव, दि. ९ (प्रतिनिधी) – येथील ब्राह्मण कल्याण ट्रस्टच्या वतीने प्रथमच श्री. ब्रह्म भूषण सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात ब्राह्मण समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणार्या व्यक्तीचा सन्मान करण्यात येणार आहे. रविवार, १४ डिसेंबर रोजी या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

येथील ब्राह्मण कल्याण ट्रस्ट ही संघटना मागील कांही वर्षापासून समाजासाठी विविध उकप्रम राबवित आहे. यामध्ये सामुदायीक उपनयन संस्कार, गुणवंत विद्यार्थी सत्कार, भांडी बँक, अन्नसेवा व इतर सामाजिक उपक्रम राबवित आहे. याला समाजाचा मोठा प्रतिसादही मिळत आहे.

यावर्षी पासून संघटनेच्या वतीने ब्राह्मण समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणार्या व्यक्तींचा श्री. ब्रह्म भूषण सन्मान करण्यात येणार आहे. यावर्षी हा कार्यक्रम रविवार, १४ डिसेंबर रोजी परिमल मंगल कार्यालयात सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे.

या सोहळ्यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून खातगाव येथील श्री. समर्थ रामदासस्वामी मठातील श्री. समर्थ भक्त मोहनबुवा रामदासी, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परशुराम आर्थिक विकास महामंडाळाचे अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले तर परशुराम आर्थिक विकास महामंडळासाठीचे उपोषणकर्ते दिपक रणनवरे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तरी या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन ब्राह्मण कल्याण ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

यांचा होणार सन्मान

ब्राह्मण कल्याण ट्रस्ट, धाराशिवच्या वतीने आयोजित श्री. ब्रह्म भूषण सन्मान सोहळ्यात डॉ. उर्मिला गजेंद्रगडकर, रंगनाथ कुलकर्णी, डॉ. राघवेंद्र डंबळ, भारत मसलेकर, राजेंद्र अत्रे यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

# सिद्धीविनायक सोसायटीतर्फे खामसवाडी येथे माती–पाणी परीक्षण केंद्राचे उद्घाटन




धाराशिव (प्रतिनिधी)– जागतिक मृदा दिन निमित्त श्री सिद्धीविनायक सोसायटी, धाराशिव यांच्या वतीने खामसवाडी येथे माती व पाणी परीक्षण संकलन केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. संस्थापक दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या या उपक्रमामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मृदा आरोग्य तपासणीसाठी अत्यावश्यक आणि वैज्ञानिक सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. या केंद्रात मातीतील पोषकतत्त्वांचे विश्लेषण, पाण्याची गुणवत्ता तपासणी, संतुलित खत व्यवस्थापन, तसेच पिकउत्पादन वाढीसाठी तज्ज्ञ मार्गदर्शन अशा सेवा अल्प दरात देण्यात येणार आहेत. मातीचे आरोग्य सुधारण्यासाठी वैज्ञानिक विश्लेषण गरजेचे असल्याचे आयोजकांनी सांगितले. प्रयोगशाळा प्रमुख चंद्रशेखर गाडेकर यांनी माती परीक्षणाचे फायदे स्पष्ट करताना सांगितले की, मातीचे अचूक परीक्षण केल्याने खतांचा योग्य आणि नियोजनबद्ध वापर करता येतो. त्यामुळे उत्पादनात १५ ते २५ टक्के वाढ होते. अनावश्यक रासायनिक खतांचा वापर टळून खर्चात बचत होते. मातीतील कि, सेंद्रिय कार्बन, नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅशियम तसेच सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता परीक्षणातून ओळखता येते. त्यामुळे वैज्ञानिक शेती, पिक फेरपालट, आणि टिकाऊ उत्पादन शक्य होते. कार्यक्रमास श्री सिद्धीविनायक परिवारातील गजानन पाटील, प्रयोगशाळा प्रमुख चंद्रशेखर गाडेकर, बलराम कुलकर्णी, तसेच गावातील शेतकरी अनिल शेळके, नाना भुतेकर, विश्वास कोकणे, श्रीनिवास झोरी, विजयकुमार झोरी, राजेश गरड, सादिक सय्यद, श्रीमंत शेळके, सतिश वैदय, निशिकांत महाजन, सुशीलकुमार पारील, दत्तात्रय शेळके, महेश शेळके, श्रीमंत पाटील, प्रशांत सुरवसे, सुशिल यादव, कुलदीप सावंत, विकासकुमार झोरी, उध्दव शेळके, दत्ता जोशी यांसह अनेक शेतकरी उपस्थित होते. जागतिक मृदा दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या उपक्रमामुळे निरोगी मृदा भरघोस उत्पादन हा संदेश बळकट होत असून, शेतकऱ्यांना वैज्ञानिक शेतीचा मार्ग अधिक सुलभ होणार आहे. हे केंद्र उत्पादनक्षमता वाढविण्यास आणि खर्चात बचत करण्यास उपयुक्त ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

## क्राईम न्युज

### सोन्याचे दागिणे व रोख रकमेची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)– पोलीस ठाणे नामे- रघुनाथ वसंत वाघ, वय ४५ वर्षे, रा.मेसाई जवळगा ता. तुळजापूर जि. धाराशिव यांचे राहते घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि.११.१२.२०२५ रोजी तोडून आत प्रवेश करुन कपाटातील व डब्यातील ४८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम ६,००० असा एकुण २,४६,००० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-रघुनाथ वाघ यांनी दि.११.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३१(४),३०५ (अ) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### ॲल्युमिनीयमच्या तारा व इतर वस्तूची चोरी

नळदुर्ग (प्रतिनिधी)– पोलीस ठाणे अंतर्गत दि.१५.०९.२०२४ रोजी . नागझरी तांडा शिवारातील रिन्यु ग्रीन एनर्जी सोल्युशन्स प्रा.लि. या कंपनीच्या लाईनचे २.१ लांबीच्या अ‍ॅल्युमिनीयमच्या तारा व इको पॅन्थर कंडकट्र एकुण ८०,००० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- रावसाहेब भानुदास शेंडे, वय ४३ वर्षे, रा. हरोली ता. कवठे, महाकाळ जि. सांगली ह.मु. एस टी कॉलनी तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.११.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### मोटरसायकलला पाठीमागून धडक

तुळजापूर (प्रतिनिधी)– पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, मयत लखन विलास कांबळे, वय ३१ वर्षे, रा.भांबेवाडी जि. सोलापूर, ह.मु. हिप्परगा रवा ता. लोहारा जि. धाराशिव हे दि.०६.१२.२०२५ रोजी मोटरसायकल वरुन जात होते. दरम्यान सोलापूर ते लातुर रोडवर हंगरगा शिवार येथे कार क्र एमएच ४० एसी ९२९६ चा चालक जिवन शिवराम शहारे, रा. खाडगाव नागपुर यांनी त्याचे ताब्यातील कार ही चालवून लखन कांबळे यांचे मोटरसायकलला पाठीमागून धडक दिली. या अपघातात लखन कांबळे हे गंभीर जखमी होवून मयत झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- कोंडाबाई गौतम वाघमारे, वय ६६ वर्षे, रा. हिप्परगा ता. लोहारा जि. धाराशिव यांनी दि.११.१२.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं. कलम २८१, १०६, १२५(बी) सह १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**झाडे लावा!**
**झाडे जगवा!!**
**झाडे तोड रोखा !!!**

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## सहयोगी मित्रपक्ष नाराज होता कामा नये

महाराष्ट्रात महायुतीची सत्ता आहे. भाजपाचे मित्र पक्ष म्हणून अजित पवार यांची राष्ट्रवादी तर एकनाथ शिंदे यांची शिवसेना साथ देत आहे. तसेच विरोधीपक्ष उद्धव ठाकरे यांची शिवसेना, कॉंग्रेस सह शरद पवार यांची राष्ट्रवादी साथ देत आहे. या सर्वांना माहिती आहे की, आपण एकटे काही करू शकत नाही. एकमेकाची साथ हवी. तरी एकमेकावर राग व्यक्त केला जात असल्याचे दिसून येत आहे. भाजपाने प्रदेशाध्यक्ष बदलले. त्यांना तर राज्य स्वळावरच चालते असे वाटत असल्याने की, काय एकनाथ शिंदे यांच्यावर मतभेद चव्हाट्यावर दिसून येत आहेत. एकनाथ शिंदे यांच्यामुळे भाजपाला महाराष्ट्रात सत्ता आली. एकनाथ शिंदे यांनी जर उद्धव ठाकरे यांची साथ सोडली नसती किंवा बंड केले नसते तर आजही भाजपाला सत्ता मिळविता आली नसती ही बाब सर्वांना माहिती आहे तरी भाजपाचे काही राज्यातील वरिष्ठ मंडळी एकनाथ शिंदे यांना डवचण्याचा प्रयत्न करीत आहेत. हे योग्य नाही. एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडली याचा अर्थ ते पॉवरबाज आहेत हे उघड आहे. तसे त्याचा पक्ष बांधील नाही. उद्याचालून ते उद्धव ठाकरे यांच्या सोबत येऊ शकतील. राज ठाकरे यांच्याशी घनिष्ठ मैत्री करू शकतील. तसेच अजित पवार यांचे आहे. त्यांना वाटले आपले चुलते यांच्या सोबत जावे तर ते सहज जाऊ शकतील. कारण राजकारणात कोणी घनिष्ठ नाही तर कोणी परावलंबी नाही. राजकारण मुळात बदलते असते. तसे वेळ व काळ पाहून बदलत असते त्यामुळे सहयोगी पक्ष नाराज होता कामा नये. काही झाले तरी राज्यात तीन पक्षाचे सत्ताधारी व तीन पक्षाचे विरोधी पक्ष एकत्र काम करीत आहेत. त्यात मनसे बाजूला आहे. मनसे सोबत उद्धव ठाकरे जाणार अशी चर्चा सुरूच आहे. प्रत्यक्षात एकत्र आल्याचे व मुंबई महानगर पालिकेच्या निवडणुकी येणार असल्याची केवळ चर्चा आहे. आगामी काळात एवढे मात्र नक्की असणार की, दोघे भाऊ एकत्र येतील. दोघापुढे दुसरा पर्याय नाही. मुळात सध्याला मनसेला मानणारा वर्ग मोठा असला तरी निवडणुकीत साथ देत नाही असेच चित्र दिसून येते. मनसेला मोठ्या शहरात मानणारा वर्ग अधिक आहे. राज ठाकरे यांच्या सभेला मोठी गर्दी होती. प्रत्यक्षात का स्विकारले जात नाही हे कळून येत नाही. मनसे स्थापने नंतर भरघोष यश मिळाले, नंतरच्या काळात यश प्राप्त करू शकले नाही. पुणे, नासीक, छत्रपती संभाजीनगर आदि शहराबरोबर मुंबईत मनसेचे कार्यकर्ते अधिक आहेत. मध्यम शहरात अजून बस्तान बसावयाचे आहे. मुंबई तशी पाहिली तर शिवसेनेची समजली जाते. मराठी माणसाची आहे. मराठी माणसाचे वर्चस्व कमी होत असल्याचे जाणवत आहे. गुजराती बरोबर आजच्या घडीला बिहारी व युपीचे नागरिक अधिक दिसून येतात तरी मराठी माणूस ठाकरे यांच्या बाजूने उभा राहातो कारण त्यांना ठाकरे परिवारावर विश्वास आहे. ठाकरे परिवाराचे काम मुंबईत अधिक आहे. त्यामुळे राज ठाकरे व उद्धव ठाकरे हे एकत्र येणे भाजपाला धोक्याची घंटा दिसून येत असणार. त्यात उद्धव ठाकरे यांनी जर मनसे सोबत केली तर कॉंग्रेस बाजूला जाणार असे बोलले जात आहे. एकंदरीत पेच निर्माण होत आहे. त्यामुळे भाजपा सध्याला कोणालाही दुखावत नाही. आपल्यापरिने वाटचाल करीत आहे. मध्येच पृथ्वीराज चव्हाण यांनी आगामी पंतप्रधान हा महाराष्ट्राचा होईल असे वक्तव्य केले होते. महाराष्ट्राचे दोन नेते दिल्ली गाजविणारे आहेत. नितीन गडकरी व दुसरे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत. मुळात पृथ्वीराज बाबा यांनी कोणत्या आधारे वक्तव्य केले यावर केवळ चर्चाच सुरू आहे. चर्चा होत असते. असे जरी समजले तरी बाबासारख्या नेत्यांचे वक्तव्य हे विचार करायाला लावणारे आहे हे विसरता येऊ शकत नाही. भाजपाने प्रदेशाध्याची धुरा बावनकुळे यांच्याकडील आता शिंदे यांच्याकडे दिल्यानंतर राज्यात फारसा फरक दिसून येत नाही. राणे व त्यांच्यात वाद निर्माण झाला आहे. राज्याचा पुर्ण अभ्यास असणारा नेता हाच प्रदेशाध्यक्ष असणे योग्य आहे. त्यात राज्यात तीन पक्षाची सत्ता आहे. हे तीन पक्ष तसे कमी नाहीत किंवा त्यांना पर्याय ही स्वतंत्र आहेत. बांधील असे नेते नाहीत हे उघड आहे. अजित पवार हे अनेक वेळा लोकचर्चेत सापडले आहे. धनंजय मुंडे व आता अजित पवार पुत्र हे जमीन घोट्याळ्या आडकले आहेत अशी चर्चा असताना देखिल त्यांनी न डगमगळा वाटचाल सुरू आहे. सध्याला राज्यात प्रत्येकाला एकमेकाची गरज आहे. सोडता ही येत नाही अशी स्थिती आहे हे मान्यच केले पाहिजे. कोणाताही स्वबळावर चालण्याची क्षमता नाही हे उघड आहे. तसे बहुमत नाही. ज्यावेळी स्वबळावरचे बहुमत मिळेल त्याच वेळी अतिषय वेगाने कामकाज होऊ शकेल. सध्याला विविध योजनेमुळे आर्थिक संकटात दिसून येत आहे. असे असले तरी प्रत्यक्षात मात्र राज्यातील स्थिती समाधानाची नाही. एकीकडे खर्चाचा व व्याजाचा डोंगर वाढता आहे. आर्थिक संकट असताना वाटचाल सुरू आहे. तरी विरोधकात जी क्षमता असावयास पाहिजे ती दिसून येत नाही. अजून राज्याला विरोधीपक्ष नेता मिळाला नाही. त्यामुळे राज्यात सर्वांना एकमेकावर आवलंबुन राहावे लागत आहे. उघड बोलले तरी नाराज होता येत नाही. भाजपाला चांगल्या जागा मिळाल्या आहेत. तरी राज्यात इतरावर आवलंबुन राहावे लागते हे उघड आहे. एकनाथ शिंदे व अजित पवार यांना अधिकृत पक्ष व पक्ष चिन्हा बाबत अजून न्यायालयीन निर्णय झालेला नाही. याकडे सर्वांचे डोळे असले तरी एकनाथ शिंदे किंवा अजित पवार तसे बांधील नाहीत हेही उघड आहे. ते इतर निर्णय घेण्यात सक्षम आहेत. उद्याचालून काही ही निर्णय घेऊ शकतात. जरी काही बाबतीत धाडसी निर्णय घेतला तर चौकशीला समोरे जावे लागते हे नेत्यास नाही तर जनतेला कळून आले आहे. त्यामुळे आहे त्या स्थितीत राज्यात वाटचाल दिसून येत आहे. एकमेका शिवाय पर्याय नाही. कुरबुर झाली तरी सांभाळून घेतल्याशिवाय पर्याय नाही. त्याच प्रमाणे राज्यात जे चालले आहे ते सत्ताधारी व विरोधी तेवढ्यापुरते दिसून येत आहेत. हे लोकशाहीत चालते याचा विचार राज्यातील जनतेनी केला पाहिजे.

# राजकारणातील निष्कलंक पर्व : आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर



भारतीय राजकारणातील एक निष्कलंक, अभ्यासू आणि संयमी नेतृत्वाचे प्रतीक असलेले माजी केंद्रीय गृहमंत्री, लोकसभेचे माजी सभापती आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मा. शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाने (जन्म: १२ ऑक्टोबर १९३५ - मृत्यू: १२ डिसेंबर २०२५) देशाच्या राजकीय क्षितिजावर एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. आपल्या सुसंस्कृत, मूल्यनिष्ठ आणि निष्कलंक राजकीय प्रवासाने त्यांनी एक असा आदर्श निर्माण केला, जो येणाऱ्या प्रत्येक राजकीय पिढीसाठी मार्गदर्शक ठरेल.

नेतृत्वाचा प्रवास

नगराध्यक्षपदापासून पंजाबचे राज्यपाल या सर्वोच्च पदांपर्यंतचा त्यांचा प्रवास हा चारित्र्यनिष्ठ नेतृत्वाचा एक वस्तुनिष्ठ, पण हृदयस्पर्शी अध्याय आहे. प्रमुख राजकीय टप्पे म्हणून लातूरचे नगराध्यक्ष म्हणून १९६६ मध्ये सुरू झालेली त्यांची सार्वजनिक कारकीर्द देशाच्या सर्वोच्च पदांपर्यंत पोहोचली. नगराध्यक्ष, लातूर १९६६ ते १९७०, आमदार, लातूर १९७२ ते १९८०, विधानसभा अध्यक्ष, महाराष्ट्र १९७८ ते १९७९, लोकसभा सदस्य, लातूर, १९८० ते २००४ (सात वेळा), लोकसभा सभापती (स्पीकर),१९९१ ते १९९६, केंद्रीय गृहमंत्री २००४ ते २००८, राज्यपाल, पंजाब २०१० ते २०१५ असा राहीला आहे.

मूल्याधिष्ठित राजकारणाचे प्रतीक

आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या ६० वर्षांच्या प्रदीर्घ राजकीय आयुष्यात त्यांच्यावर एकही आरोप, राजकीय डाग किंवा भ्रष्टाचाराचे शिंतोडे लागू दिले गेले नाहीत. त्यांनी कायम मूल्याधिष्ठित राजकारणाचे प्रतीक म्हणून स्वतःला सिद्ध केले. गांधी परिवाराचे निकटवर्तीय असूनही, त्यांनी कधीही आपल्या पदाचा वा अधिकाराचा गैरवापर केला नाही. २००४ मध्ये पराभूत झाल्यानंतरही त्यांचा राजकीय प्रभाव कायम राहिला, जो त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खोली दर्शवतो.

संसदीय परंपरांचे जनक

आदरणीय शिवराज पाटील साहेब यांनी संसदेत आणि विधिमंडळात एक आदर्श राजकीय संस्कृती रुजवली. लोकसभा सभापती म्हणून (१९९१-१९९६) त्यांनी निर्माण केलेल्या नवनवीन संसदीय परंपरा, नियमांचे काटेकोर पालन आणि सभागृहातील शिस्तयाकडे आजही आदराने पाहिली जाते.

मराठी, इंग्रजी आणि हिंदी भाषेवरील त्यांचे प्रभुत्व मोठे होते. त्यांच्या विचारमंथनातून आणि मांडणीतून विषयाची सखोलता, संतुलन आणि विवेक दिसून येई. राजकारणात कुरघोडी करणे किंवा विरोधकांवर टीका करणे त्यांनी कटाक्षाने टाळले. त्यांनी विरोधकांसाठीही कधीही अपशब्द वापरले नाहीत, ज्यामुळे त्यांचा संवाद कायम सभ्य आणि शिस्तबद्ध राहिला. विरोधकांसोबतही राखलेला शिस्तबद्ध आणि सभ्य संवाद हा त्यांच्या नेतृत्वाचा दुर्मिळ गुण होता. त्यांच्या या गुणांमुळेच भारतीय लोकशाही व्यवस्थेला शांत, संयमी आणि कणखर नेतृत्व प्राप्त झाले.

लातूरच्या विकासाचे प्रणेते

आदरणीय शिवराज पाटील साहेब यांचे कार्य केवळ दिल्लीपुरते मर्यादित नव्हते, तर त्यांनी लातूर आणि मराठवाड्याच्या राजकीय घडामोडींना नवी दिशा दिली. लातूरचे नगराध्यक्ष असताना त्यांनी शिवछत्रपती वाचनालयासारख्या ज्ञान-उपक्रमांची पायाभरणी केली. तसेच, शहर विकासाचे अनेक दूरदृष्टीचे प्रकल्प राबवले, ज्यामुळे लातूरच्या विकासाचा प्रारंभ झाला. ते लिंगायत समाजातून आले असले तरी, त्यांनी स्वतःला कधीही एका जातीपुरते मर्यादित ठेवले नाही. सर्वधर्म समभावाचे पालन करतानाच, लातूरमधील सर्व समाज घटकांत त्यांचे मोठे आदराचे स्थान होते.

लातूरच्या राजकारणात आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर, डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर, आदरणीय विलासराव देशमुख आणि सहकार महर्षी दिलीपराव देशमुख या नेत्यांमुळे उच्च मूल्यांची परंपरा निर्माण झाली. आज या माध्यमातूनच जिल्ह्यात सहकार, शिक्षण, सिंचन, उदयोग, रेल्वेसह पायाभुतसुवींधांच्या विकासाला मोठी चालना मिळाली.

लोकशाहीतील अमूल्य योगदान

आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर यांनी ११ व्या लोकसभेचे सभापती (स्पीकर) म्हणून कार्य केले. त्यांची भूमिका केवळ सभागृहाचे कामकाज चालवण्यापुरती मर्यादित नव्हती, तर त्यांनी भारतीय संसदीय लोकशाहीत शिस्त, संयम आणि नवीन परंपरा रुजवली.

उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार: देशाच्या लोकशाहीला अधिक बळकटी देण्यासाठी आणि सदस्यांना त्यांच्या संसदीय कार्यात उत्कृष्ट कामगिरीसाठी प्रेरणा मिळावी म्हणून, १९९२ मध्ये त्यांनी उत्कृष्ट संसदपटू पुरस्काराची सुरुवात केली.

नवीन संसद भवनाची कल्पना: सध्याच्या संसद भवनाची व्याप्ती आणि भविष्यातील गरजा लक्षात घेऊन, मा. चाकूरकर यांनी लोकसभेचे सभापती असताना नवीन संसद भवनाच्या निर्मितीचा प्रस्ताव ठेवला होता. विधानसभा अध्यक्ष आणि लोकसभा सभापती या दोन्ही पदांवर असताना त्यांनी घेतलेले निर्णय आजही संसदीय कामकाजात उत्तम उदाहरण म्हणून पाहिले जातात.

नैतिकतेचा सर्वोच्च मापदंड (गृहमंत्रीपदाचा राजीनामा)

सन २००४ च्या लोकसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर, काँग्रेस पक्षाने त्यांचा अनुभव ओळखून त्यांना राज्यसभेवर घेतले आणि डॉ. मनमोहन सिंग यांच्या मंत्रीमंडळात केंद्रीय गृहमंत्री हे अत्यंत महत्त्वाचे पद दिले. या काळात त्यांनी अंतर्गत सुरक्षा आव्हानांना शांतपणे तोंड दिले. त्यांच्या संपूर्ण राजकीय कारकिर्दीत कोणताही भ्रष्टाचाराचा आरोप नसणे, हे त्यांच्या चारित्र्यसंपन्न नेतृत्वाचे प्रमाण आहे.

आदरणीय शिवराज पाटील साहेब यांच्या कार्यकाळात, २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर भीषण दहशतवादी हल्ला झाला. या गंभीर राष्ट्रीय घटनेची नैतिक जबाबदारी स्वीकारत, त्यांनी हल्ल्यानंतर अवघ्या दोन दिवसांनी, ३० नोव्हेंबर २००८ रोजी, गृहमंत्रिपदाचा राजीनामा दिला. राजकारणात सर्वोच्च पदावर असताना नैतिकतेचे मूल्य जपत राजीनामा देण्याचा हा निर्णय त्यांच्या चारित्र्यनिष्ठ नेतृत्वाचा आणि उच्च राजकीय संस्कृतीचा एक महत्त्वाचा दाखला आहे.

१२ डिसेंबर २०२५ रोजी, वयाच्या ९० व्या वर्षी, लातूरमधील देवघर निवासस्थानी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गृहमंत्री, लोकसभा सभापती आणि राज्यपाल म्हणून त्यांनी घेतलेले महत्त्वपूर्ण निर्णय देशासाठी नेहमीच मार्गदर्शक ठरले आहेत. आपल्याला सोडून गेले तरी भारतीय राजकारणातील एक निष्कलंक आणि ऋषितुल्य पर्व आपल्या सोबत कायम राहील.

या निधनाने देशाने एक मार्गदर्शक नेता गमावला आहे. त्यांचे विचार, मूल्ये, उदाहरण आणि शिस्तप्रियताहीच त्यांची खरी वारसा-ठेव आहे. आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर साहेबांना विनम्र, भावपूर्ण श्रद्धांजली. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि चाकूरकर कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो.

**-राहुल हरिभाऊ इंगळे पाटील**
मो. ९८९०५७७१२८

# रेल्वे पंढरपूर-तिरुपती दरम्यान साप्ताहिक विशेष गाड्या चालवणार

**सोलापूर/प्रतिनिधी :** रेल्वेने पंढरपूर आणि तिरुपती दरम्यान साप्ताहिक विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणे:- पंढरपूर-तिरुपती साप्ताहिक विशेष गाड्या - गाडी क्रमांक ०७०१२ तिरुपती-पंढरपूर साप्ताहिक विशेष ट्रेन २०.१२.२०२५ ते ३१.१२.२०२५ पर्यंत दर शनिवारी सायंकाळी ०४:४० वाजता तिरुपतीहून निघेल आणि दुसऱ्या दिवशी सायंकाळी ०६:५० वाजता पंढरपूरला पोहोचेल. थांबे: रेणिगुंटा, राजमपेटा, ओंटिमिट्ट, कडपा, येरगुंटला, ताडिपत्रि, गूटी, डोन, कर्नूलु सिटी, गदवाल, वनपर्ती रोड, महबूबनगर, जडचर्ला, शादनगर, उमदानगर, काचीगुडा, सिकंदराबाद, बेगमपेट, लिंगमपल्ली, शंकरपल्ली, विकाराबाद, जहीराबाद, बीदर, भालकी, उदगीर, लातूर रोड, लातूर, धाराशिव, बार्शी टाऊन, कुर्डूवाडी, मोडलिंब - गाडी क्रमांक ०७०३२ पंढरपूर-तिरुपती विशेष ट्रेन २१.१२.२०२५ ते २८.१२.२०२५ पर्यंत दर रविवारी पंढरपूरहून रात्री ०८:०० वाजता निघेल आणि दुसऱ्या दिवशी रात्री १०:३० वाजता तिरुपतीला पोहोचेल. थांबे: मोडलिंब, कुर्डूवाडी, बार्शी टाऊन, धाराशिव, लातूर, लातूर रोड, उदगीर, भालकी, बीदर, जहीराबाद, विकाराबाद, शंकरपल्ली, लिंगमपल्ली, बेगमपेट, सिकंदराबाद, चर्लपल्ली, नल्लगोंडा, मिर्यालगुडा, नडीकुडी, सर्त्तनपल्ली, गुंटूर,तेनाली, बापटला, ओंगोल, नेल्लुर, गुडुर,श्री कालहस्ती, रेणिगुंटा

रचना:

- २०.१२.२०२५ ते ०३.०१.२०२६ पर्यंत १ फर्स्ट एसी कम एसी II-टायर, ३ एसी III-टायर, १४ स्लीपर क्लास, ४ जनरल सेकंड क्लास आणि २ गार्ड कम ब्रेक व्हॅन (२४ कोच)


- ०४.०१.२०२५ ते ०१.०२.२०२६ पर्यंत १ एसी II-टायर, ३ एसी III-टायर, १४ स्लीपर क्लास, ४ जनरल सेकंड क्लास आणि २ गार्ड कम ब्रेक व्हॅन (२४ कोच)

आरक्षण आणि बुकिंग: विशेष शुल्कावर विशेष गाड्यांचे आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in वेबसाइटवर उघडेल.

अनारक्षित कोचचे बुकिंग स्थानकांवर बुकिंग काउंटर आणि णढड ॲपद्वारे देखील करता येईल. प्रवाशांना गैरसोय टाळण्यासाठी वैध तिकिटांसह प्रवास करण्याची विनंती केली जाते.

या विशेष गाड्यांच्या थांब्यांच्या तपशीलवार वेळेसाठी, कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा RailOne किंवा NTES ॲप डाउनलोड करा. प्रवाशांना विनंती आहे की त्यांनी वरील विशेष गाड्यांच्या सुविधेचा लाभ घ्यावा.

**प्रो. जडे यांचे रबरी शिक्के**
**कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले**
**टिकाऊ रबरी शिक्के**
**तयार करून मिळतील.**




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

## जगन्नाथ पुरीचा 'रत्न भंडार' गुपितांचा खजिना आहेष्ठ आत आहे किती सोने-चांदी

श्री जगन्नाथ मंदिर, श्रीमंदिर म्हणूनही ओळखले जाते, हे पुरी, ओरिसा येथे स्थित एक महत्त्वाचे धार्मिक स्थान आहे. या मंदिराची सर्वात मौल्यवान संपत्ती म्हणजे 'श्री रत्न भंडार'. मंदिराच्या नियमानुसार आणि प्रथेनुसार श्री जगन्नाथ महाप्रभूंना अर्पण केलेले सर्व सोने, रत्ने इत्यादी रत्न भांडारात साठवले जातात. जगन्नाथ मंदिरासाठी जगभरातील भक्तांनी दिलेल्या योगदानामुळे आणि देणग्यांमुळे हा खजिना समृद्ध झाला आहे. जगमोहन मंदिराच्या उत्तरेला रत्न भंडार आहे.

रत्न भंडार हे जगन्नाथ मंदिराचा खजिना आहे, ज्यामध्ये भगवान जगन्नाथ, बलभद्र आणि सुभद्रा यांचे विविध दागिने आणि रत्ने ठेवलेली आहेत. यात सोन्याचे आणि चांदीचे मुकुट, दागिन्यांचे बांगड्या आणि हार, विविध प्रकारची भांडी आणि इतर दागिने आणि अनमोल धार्मिक वस्तूंचा समावेश आहे. रत्न भंडारामध्ये असलेल्या खजिन्याचे अचूक मूल्यमापन करणे कठीण आहे, कारण तो फार क्वचितच उघडला गेला आहे आणि गूढतेने वेढलेला आहे. मात्र, त्याची किंमत कोट्यवधी रुपये असल्याचे मानले जात आहे.

**म्हणूनच बंद आहे रत्नांचे भंडार**

सुरक्षेच्या कारणास्तव आणि त्यात ठेवलेल्या मौल्यवान वस्तूंच्या संरक्षणासाठी रत्न भंडार १९७८ पासून बंद आहे. अलिकडच्या वर्षात ते उघडण्याचे प्रयत्न झाले, परंतु तांत्रिक आणि सुरक्षिततेच्या कारणांमुळे ते यशस्वी होऊ शकले नाहीत. २०१८ मध्ये मंदिर प्रशासनाने ते उघडण्याचा प्रयत्न केला, पण आत प्रवेश करता आला नाही.

**दोन चेंबर्समध्ये संग्रहित**

मंदिराच्या नियमानुसार आणि प्रथांनुसार, भगवान जगन्नाथाला अर्पण केलेले सर्व सोने आणि दागिने रत्न भांडारच्या दोन खोलीत, आतल्या खोलीत आणि बाहेरच्या खोलीत साठवले जातात. देवतांच्या विविध धार्मिक विधींसाठी बाहेरील खोली उघडली जाते आणि तेथे ठेवलेले दागिने आणि मौल्यवान वस्तू भगवान जगन्नाथाच्या 'सुनाभेष' (सोन्याचे कपडे) दरम्यान वापरल्या जातात. आतील चेंबर १९७८ पासून उघडले गेले नाही, जेव्हा ते यादीसाठी शेवटचे उघडले होते.

**अंतर्गत चेंबर ऑडिट**

जगन्नाथ मंदिर कायद्यानुसार, दर तीन वर्षांनी रत्न भंडारच्या आतल्या खोलीत ठेवलेल्या सर्व मौल्यवान वस्तूंचे ऑडिट करणे आवश्यक आहे. मात्र, १९७८ पासून आतील चेंबरचे योग्य ऑडिट झालेले नाही. मंदिराच्या अधिकृत इतिहास 'मदला पंजी' नुसार, राजा अनंगभीम देव यांनी भगवान जगन्नाथाचे सोन्याचे दागिने बनवण्यासाठी २५० किलोहून अधिक सोने दान केले होते.

**विद्यमान दागिने आणि इतर वस्तू**

या वर्षी जानेवारीमध्ये उच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात मंदिर प्रशासनाने सांगितले की रत्न भंडारमध्ये सुमारे १४९.४७ किलो सोन्याचे दागिने आणि १९८.७९ किलो चांदीचे दागिने आणि भांडी आहेत. गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये, ओडिशा उच्च न्यायालयाने रत्न भंडारात ठेवलेल्या दागिन्यांसह मौल्यवान वस्तूंच्या यादीच्या तयारीवर देखरेख ठेवण्यासाठी उच्चाधिकार समिती स्थापन करण्याचे आदेश दिले होते, त्यानंतर या वर्षी फेब्रुवारीमध्ये मागील सरकारने माजी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश अरिजित पसायत यांच्या अध्यक्षतेखाली १२ सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली. समितीच्या इतर सदस्यांमध्ये प्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. रमाकांत पांडा, अलाहाबाद बँकेचे माजी सीएमडी बिधुभूषण सामल, पुरी गजपती महाराजा दिव्यसिंग देव आणि मंदिरातील विविध सेवकांचा समावेश आहे.

**राजकीय मुद्दा**

रत्ना भंडाराची चावी हरवल्याचे प्रकरण २०१८ मध्ये मोठा राजकीय मुद्दा बनला होता. भारतीय जनता पक्षाने (भाजप) विधानसभा निवडणुकीदरम्यान हा मुद्दा उपस्थित केला आणि 'ओडिया अस्मिता' (ओडिया अभिमान) शी जोडून जनता दलाला (बीजेडी) पराभूत करण्याचा प्रयत्न केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि भाजपच्या इतर प्रमुख नेत्यांनी निवडणूक प्रचारादरम्यान रत्न भंडारच्या चाव्या हरवल्याचा मुद्दा उपस्थित केला होता.

**ऐतिहासिक देणगी**

इतिहासात, विविध राजे, राण्या आणि श्रीमंत लोकांनी मंदिराला अनेक मौल्यवान वस्तू आणि दागिने दान केले आहेत. विशेषतः गजपती वंशातील राजांनी यात महत्त्वाचे योगदान दिले आहे. उदाहरणार्थ, राजा अनंगभीम देव यांनी भगवान जगन्नाथाचे सोन्याचे दागिने बनवण्यासाठी २५० किलोपेक्षा जास्त सोने दान केले. 'मदला पणजी' (उत्कल विद्यापीठ प्रकाशन-पृष्ठ ३१) नुसार, राजा अनंगभीम देव यांनी भगवान जगन्नाथाचे सोन्याचे दागिने तयार करण्यासाठी २,५०,००० 'मध' (१ मध - १२ तोळा - ५.८३१९ ग्रॅम) सोने दान केले होते.

**यांनीही देणगी दिली**

ओरिसातील सूर्यवंशी शासकांनीही भगवान जगन्नाथाला मौल्यवान दागिने आणि सोने दान केले. जगन्नाथ मंदिराच्या भिंतीवरील शिलालेखात असे म्हटले आहे की गजपती कपिलेंद्र देव यांनी १४६६ मध्ये भगवान जगन्नाथ यांना मोठ्या प्रमाणात सोने आणि रत्नजडित दागिने आणि भांडी दान केली होती. प्रसिद्ध इतिहासकार आर. डी. बॅनर्जी यांनी त्यांच्या 'हिस्ट्री ऑफ ओरिस' या पुस्तकात (पृष्ठ ३०) उल्लेख केला आहे की, १४६६ मध्ये परमेश्वराला दिलेले अनेक दागिने १८९३ मध्ये अजूनही वापरात होते.

**हुंडी आणि इतर देणग्या**

२३ ऑगस्ट १९८३ रोजी मंदिराच्या नाटा मंडपात हुंडी लावण्यात आली होती. या हुंडीमध्ये भाविक सोने, चांदी आणि रोख रक्कम दान करतात. जगन्नाथ मंदिर प्रशासनाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनानुसार ऑक्टोबर २००९ पर्यत हुंडीतून ९८०.९९० ग्रॅम सोने आणि ५०,२१७.८३२ ग्रॅम चांदी जमा झाली आहे. 'सहन मेळा' दर्शन आणि 'परिमाणिक' दर्शनादरम्यान रत्न सिंहासनावर ठेवलेल्या झरी पिंडिकेलाही भाविक सोन्या-चांदीचे दागिने दान करतात. हुंडी आणि पिंडिकेतून गोळा केलेले सोन्या-चांदीचे दागिने रत्नांच्या दुकानात ठेवले आहेत की अन्य कुठे हे स्पष्ट झालेले नाही. त्यांचे योग्य मूल्यमापन होत आहे की नाही हे देखील अनिश्चित आहे.

**रत्न सुरक्षा**

रत्न भंडाराच्या सुरक्षेची जबाबदारी मंदिर प्रशासनाची आहे. याशिवाय पोलीस आणि ओडिशा सरकारच्या इतर सुरक्षा यंत्रणाही त्याच्या सुरक्षेत महत्त्वाची भूमिका बजावतात. सुरक्षा व्यवस्था अतिशय कडेकोट आहे आणि निगराणीखाली ठेवण्यात आले आहे.

रत्नांच्या भंडाराची सुरक्षा आणि पारदर्शकता महत्त्वाची!

रत्न भंडारातील मौल्यवान सामग्रीचे योग्य मूल्यमापन आणि सुरक्षित संरक्षण आवश्यक आहे. भाविकांच्या मनात कोणतीही शंका येऊ नये, यासाठी रत्न भंडाराची सुरक्षा पारदर्शकपणे पार पाडावी. रत्न भंडार दागिन्यांचे वेळोवेळी योग्य मूल्यमापन व लेखापरीक्षण व्हायला हवे, जेणेकरुन ती सुरक्षित ठेवण्याबरोबरच भाविकांची श्रद्धा व विश्वासही टिकून राहील. रत्न भंडाराच्या आत आणि बाहेर असलेल्या खजिन्याची यादी आणि वर्णन स्पष्टपणे सार्वजनिक केले जावे, जेणेकरून भक्तांना खात्री देता येईल की त्यांनी अर्पण केलेल्या वस्तूंचे जतन केले जात आहे.

**रत्न भंडार हा खजिना नसून ओडिशाच्या संस्कृतीचे, इतिहासाचे आणि आदराचे प्रतीक आहे.**

जगन्नाथ पुरीचे रत्न भंडार हा केवळ खजिनाच नाही, तर ओडिशाच्या संस्कृतीचे, इतिहासाचे आणि आदराचे प्रतीक आहे. त्यात लपलेले अमूल्य रत्न आणि दागिने केवळ ऐतिहासिक महत्त्वच नाही तर भक्तांच्या अपार श्रद्धा आणि भक्तीचेही प्रतीक आहेत. रत्नांच्या भंडाराची सुरक्षा आणि पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी राज्य सरकार आणि मंदिर प्रशासनाने एकत्र काम केले पाहिजे. भाविकांचा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी आणि त्यांच्या श्रद्धेचा आदर करण्यासाठी रत्न भंडारच्या सर्व मालमत्तेचे योग्य मूल्यमापन आणि वेळोवेळी ऑडिट केले पाहिजे. मंदिराच्या मालमत्तेचे योग्य रीतीने जतन केले जाईल आणि त्याच्या व्यवस्थापनात कोणताही निष्काळजीपणा होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

# विदारक चित्र....



गरीब व वंचित वर्गासाठी योजना आखल्याचे दावे सर्व सरकारे करतात. प्रत्यक्षात जगाच्या लोकसंख्येच्या १ टक्का व्यक्तींकडे जगातील ३७ टक्के संपत्ती एकवटली असल्याचे ताजा अहवाल सांगतो.
भारतातील केवळ १० टक्के व्यक्तींकडे राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५८ टक्के भाग जातो आणि तळातील ५० टक्के नागरिकांना या उत्पन्नाचा जेमतेम १५ टक्के हिस्सा मिळतो ही विदारक स्थिती मांडली आहे ताज्या 'जागतिक विषमता अहवालात'. जगाच्या बहुतेक सर्व भागात अशी विषमता दिसते हे या अहवालात नमूद केले आहे, मात्र आत्यंतिक विषमता असलेल्या देशांमध्ये भारताचा क्रमांक वरचा आहे, हेही त्यातून दिसते. देशातील एकूण संपत्तीपैकी ६५ टक्के संपत्ती १० टक्के व्यक्तींच्या ताब्यात आहे त्यातही केवळ १ टक्का व्यक्तींकडे ४० टक्के संपत्ती आहे. सर्वसामान्य त्यांना 'अति श्रीमंत'म्हणतात. स्वित्झर्लंडच्या 'वर्ल्ड इनइक्वॅलिटि लॅब' या संस्थेने हा अहवाल तयार केला आहे. भार-तात संपत्तीच्या बाबतीत विषमता जास्त असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. भारत कितव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होणार याची चर्चा रंगते, पण त्यावेळी देशातील विषमतेचा कोणी उल्लेखही करत नाही. लाखो जणांना मोफत धान्य पुरवावे लागते हे विषमतेचे उदाहरण आहे.
२०२२मध्ये भारतातील १० टक्के श्रीमंतांकडे राष्ट्रीय उत्पन्नाचा ५७ टक्के हिस्सा होता व तळातील ५० टक्के नागरिकांकडे १३ टक्के होता. '८०च्या दशकापासून देशातील श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत व गरीब अधिक गरीब होत असल्याचे या अहवालावरून दिसते. गरिबांची संख्या वाढली-गेल्या चार दशकांत श्रीमंत-गरीब यांच्यातील दरी कशी वाढली आहे हे या अहवालाने अनेक पुरावे, आलेख याद्वारे मांडले आहे. १९८० मध्ये जागतिक श्रीमंती उत्तर अमेरिका, युरोप वगैरे भागात मर्यादित होती. चीन त्याच्या आसपासही नव्हता. चीन आणि भारत मुख्यत्वे तळाच्या गटात होते. २०२५पर्यंत चीनच्या लोकसंख्येपैकी बहुतेकजण 'मधील' ४० टक्के गटात आले. १९८० मध्ये भारताच्या लोकसंख्येपैकी बरेचजण मधील ४० टक्क्यात होते म्हणजेच मध्यमवर्गीय होते; पण आता बहुतेक भारतीय 'तळाच्या' ५० टक्क्यांत आले आहेत हे या अहवालातील निरीक्षण भारताची अधोगती दाखवते.
भारतात कोट्यधीश व अब्जाधीशांची संख्या वाढत असताना गरिबांची संख्याही वाढत आहे असा त्याचा अर्थ होतो. या अहवालानुसार, परचेसिंग पॉवर पॅरिटीच्या आधारे भारताचे सरासरी वार्षिक दरडोई उत्पन्न ६,२०० यूरो किंवा युरो-रुपया यांच्या आजच्या विनिमय दरानुसार ६ लाख ५६ हजार ५३रुपये आहे.सरासरी संपत्ती सुमारे २८ हजार युरो-२९ लाख ६२ हजार ८२० रुपये आहे. रुपयाच्या घसरणीमुळे एका युरोसाठी आता सुमारे १०५ रुपये मोजावे लागतात हे लक्षात घेतले पाहिजे. कामगार क्षेत्रात महिलांचा सहभाग अजूनही १५.७ टक्के एवढा कमी आहे, त्यात गेल्या दहा वर्षांत सुधारणा झालेली नाही. उत्पन्न, संपत्ती व लिंगभेद या आधारावर भारतातील विषमता तीव्र असल्याचे अहवालात म्हटले आहे. १९८० पासून भारतातील श्रीमंत व गरीब यांच्यातील उत्पन्नाच्या हिस्सेदारीतील दरी वाढत गेल्याचे या अहवालात आलेखांच्या द्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.
जनतेच्या मोठ्या वर्गाला अतिगरीब गटातून बाहेर काढल्याचा दावा सरकार करत असले तरी त्यांच्या वाट्याला राष्ट्रीय उत्पन्नाचा किरकोळ वाटा येतो हे त्यातून दिसते. २००० नंतर भारतातील श्रीमंतांची श्रीमंती वाढत गेली व गरीब अधिक तळात ढकलेले गेले हेही या आलेखातून समोर येते.
म्हणजेच भारतात 'सबका विकास' झालेला नाही हे स्पष्ट आहे.
जागतिक पातळीवरील स्थिती अधिक गंभीर आहे.
जगातील संपत्तीपैकी तीन चतुर्थांश संपत्ती १० टक्के जणांकडे आहे, तर तळातील ५० टक्के वर्गाकडे केवळ २ टक्के संपत्ती आहे. भारतात आर्थिक प्रगती वेगाने झाल्याचे सांगितले जाते. मात्र हा विकास तंत्रज्ञान आणि भांडवलावर आधारित आहे. त्याचा लाभ केवळ १० टक्के वर्गाला मिळाला.
ज्यांच्याकडे भांडवल आहे ते श्रीमंत झाले, पण नोकरदार, कष्टकरी वर्गाच्या उत्पन्नात वाढ झाली नाही. याच वर्गाला वाढत्या महागाईचा सामना करावा लागतो. आरोग्य सेवा, शिक्षण त्यांच्यासाठी दुर्लभ ठरते. विषमतेचा हा अहवाल 'समते' च्या दाव्यांना छेद देणारा आहे.



# संत मुक्ताबाई




महाराष्ट्रात अनेक संत होऊन गेले त्यात पुरुष बरोबरीने महिला संतांनीही समाज प्रबोधनात खूप मोठा हातभार लावलेला आहे. संत मुक्ताबाई यांचा उल्लेख त्यात करावाच लागेल. संत मुक्ताबाई या महाराष्ट्रातील संत-कवयित्री होत्या. संत निवृत्तिनाथ, संत ज्ञानेश्वर व संत सोपानदेव हे त्यांचे थोरले भाऊ होते. संत मुक्ताबाई ह्या संत ज्ञानेश्वरांच्या धाकट्या बहीण म्हणून सर्वांना परिचित आहेत. परंतु त्यांचे स्वतःचेही स्वतंत्र व्यक्तीमत्व होते. त्यांनी रचिलेले ताटीचे अभंग हे त्यांच्या नावावर नोंदविलेले आहेत. या अभंगांमध्ये त्यांनी संत ज्ञानेश्वरांना काही बोध दिला आहे. त्या योगी चांगदेवांच्या गुरू होत्या. त्यांनी ज्ञानबोध या ग्रंथाचेही लेखन केले आहे असे संशोधनांती स्पष्ट होते. ह्या ग्रंथामध्ये संत निवृत्तीनाथ आणि संत मुक्ताबाई ह्यांचा संवाद आलेला आहे. त्या समाधिस्थ होण्याच्या थोडेसे आधी झालेले हे लिखाण असावे, असे त्यातील अंतर्गत संदर्भांवरून लक्षात येते.
त्यांचा जन्म शके ११९९ किंवा शके १२०१ मध्ये आश्विन शुद्ध प्रतिपदेला (घटस्थापना) झाला असा उल्लेख आहे. ब्रह्मगिरीची प्रदक्षिणा, मातापित्यांचा देहत्याग, ज्ञानेश्वरांनी मुक्ताबाईस दिलेली सनद, विसोबा खेचर यांचे शरण येणे हे त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचे प्रसंग. शुद्धिपत्र मिळविण्यासाठी चौघे भावडं पैठण गावी आले. ताटी उघडा ज्ञानेश्वरा अशी आर्जव मुक्ताईने ज्ञानेश्वरांना केली होती. ज्ञानेश्वरांकडून ज्ञानेश्वरीची निर्मिती करण्यातही मुक्ताबाईचा मोलाचा वाटा आहे. मुक्ताबाईने चांगदेवाना 'पासष्टी'चा अर्थ सांगितला. त्यानंतर चांगदेव महाराज मुक्ताबाईचे पहिले शिष्य झाले. मुक्ताबाईंवर गोरक्षनाथांच्या कृपेचाही वर्षाव झाला होता. त्यानंतर मुक्ताबाईला अमृत संजीवनीची प्राप्ती झाली.
मुक्ताबाई यांची अभंग निर्मितीही अतिशय अर्थपूर्ण आणि समाजाभिमुख आहे. त्यांच्या अभंगातून सर्वांच्या जीवनाच्या अनुषंगाने उल्लेख आढळतो. अशा या संत मुक्ताबाईस विनम्र अभिवादन.

# अन्न हे परब्रह्मः फिश फ्राय



साहित्य - अर्धा किलो पापलेट किंवा राऊ (कमी काटयाचा मासा), थोडीशी चिंच, १०-१२ लसूण पाकळया, १ इंच आले, १ चमचा लाल तिखट, चवीनुसार मीठ, १ वाटी ज्वारीचे पीठ, तळण्याकरता तेल.
कृती - पॉपलेट स्वच्छ धुवून सुरी उलटया बाजूने फिरवून खवले काढून टाकावेत. डोक्याचा व शेपटीचा भाग वेगळा करून सारख्या आकाराचे आडवे अंदाजे १० तुकडे करावेत. सगळे तुकडे स्वच्छ धुवून घ्यावेत. चिंचेचा कोळ काढून घ्यावा. चिंचेचा कोळ, वाटलेले आले, लसूण, १ चमचा तिखट व चवीनुसार मीठ हे सर्व एकत्र करून पॉपलेटच्या तुकडयांना सर्व बाजूने चोळून घ्यावे व ८ ते १० तास झाकून ठेवावे. फ्राय करायच्यावेळी सर्व तुकडे लावलेल्या मसाल्यासकट दोन्ही बाजूने ज्वारीच्या पीठातघोळवून फ्रायपॅनमध्ये पुरेसे तेल घालून एका वेळेला २ किंवा ३ तुकडे लावून दोन्ही बाजूने खरपूस तळावेत. मासा धुतांना लिंबाचा रस पाण्यात खळखळून स्वच्छ धुवावेत म्हणजे माशाचा वास कमी होतो. फिश फ्रायसाठी काळया पाठीचा पॉपलेट चांगला लागतो.

# आपले निरोगी मूत्राशयासाठीः जेष्ठांसाठी महत्वाच्या टिप्स




निरोगी मूत्राशयासाठी टिप्स (इश्ररववशी उरीश ढळ्ीी):
भरपूर पाणी प्या (डींू कूीरींशव): पाणी शरीरातील हानिकारक जीवाणू बाहेर काढण्यास मदत करते आणि मूत्राशय स्वच्छ ठेवते.
आहारात बदल करा (ऊळशींरी उहरपसशी):
लिंबू आणि चुना पाण्यात मिसळून प्या.
निरोगी चरबी (क्शरश्रींहू ऋरीी) आणि एक्स्ट्रा व्हर्जिन ऑलिव्ह ऑइलचा वापर करा.
अल्कोहोल आणि मसालेदार पदार्थ मूत्राशयाला त्रास देऊ शकतात, म्हणून त्यांचे सेवन टाळा.मूत्र रोखू नका लघवी आल्यावर लगेच जा. जास्त वेळ रोखून धरल्याने संसर्ग होण्याचा धोका वाढतो.
(मूत्रमार्गाचा संसर्ग) असल्यास (ऋ्री णढखी): भरपूर पाणी प्या आणि क्रॅनबेरी सप्लीमेंट्स डॉक्टरांच्या सल्ल्याने घ्या, असे उपाय णढख च्या घरगुती उपचारात मदत करू शकतात.
निरोगी मूत्राशयासाठी भरपूर पाणी प्या, लिंबू-चुनायुक्त पाणी घ्या, निरोगी चरबी आणि फळे-भाज्या खा, क्रूसिफेरस भाज्यांचा आहारात समावेश करा आणि केगल व्यायाम करून स्नायू मजबूत करा; तसेच, मूत्राशयाला त्रास देणाऱ्या गोष्टी टाळा आणि णढख झाल्यास भरपूर पाणी आणि क्रॅनबेरी सप्लीमेंट घ्या (डॉक्टरांच्या सल्ल्याने).
पुरेशा फळे आणि भाज्या खा.
आहारात क्रूसिफेरस भाज्या (जसे की ब्रोकोली, कोबी) समाविष्ट करा.
व्यायाम करा (एुशीलळीश):
नियमित व्यायामामुळे मूत्राशयाचे स्नायू (झशश्रींळल ऋश्रेी चींलश्रशी) मजबूत होतात, ज्यामुळे लघवी थांबवणे सोपे होते.मूत्राशयाला त्रास देणाऱ्या गोष्टी टाळा कॅफीन,

## मुरुमे टाळण्यासाठी 'हे' करा



डॉक्टर टीप्स



पण वास्तवात ही छिद्रे आतल्या बाजूने बंद झालेली असतात. ॲक्नेला झाकण्याऐवजी सतत चेहरा धूत राहिल्याने ही छिद्रे अधिकच छेडली जातात आणि अधिक भरतात. यामुळे त्वचा प्रचंड कोरडी बनू शकते. दिवसांतून केवळ दोन वेळा चेहरा धुणे योग्य.
मिथक: उन्हामुळे 'मुरुमं' स्वच्छ होतात
वास्तव : दिवसातून १०-२० मिनिटे सूर्यप्रकाशात राहिल्याने मुरुमांचा त्रास असलेल्या मंडळींना काही मदत होऊ शकते, हे खरे आहे. विशेषत: अशी मुरमं पाठीवर किंवा शरीराच्या इतर भागांवर असतील तर. पण खूपवेळ उन्हात राहिल्याने त्वचेची हानीच होते. उन्हात राहिल्यानंतर येत्या आठवड्यांमध्ये मुरुमांची संख्या वाढलेलीच दिसेल. मिथक : मेकअप हे ॲक्ने होण्याचे एक कारण आहे. वास्तव : मुरुमं होण्यासाठी बरेचदा मेकअपला विनाकारण दोषी ठरवले जाते; **(क्रमशः)....**

**स्वतः सरकारने म्हटले आहे की, झोपडपट्टीवाल्यांना हटविणार नाही, त्यांना पट्टा देणार!!**




## विनोद

बंडू शाळेतून धावतच घरी आला आणि आईला म्हणाला, 'आई, आज वर्गात शिक्षकांच्या प्रश्नाला माझ्याशिवाय कुणीच उत्तर देऊ शकलं नाही!' आईने विचारले, 'अरे वा. प्रश्न काय होता.' शिक्षकांच्या टेबलाचा पाय कोणी मोडला!'

## संदेश

Kutte.........ka-
miney...........mat-
labi.............dhoke-
baaz..........
Ullu ke pathe.........
besharam........
baimaan..........kap-
ti.........
Aise logo se hamesha

## सुविचार



क्रोधाला लगाम घालण्यासाठी मौनाइतका उत्तम मार्ग नाही.


**- महात्मा गांधी**

**संस्कृत सुभाषित**

**दानोपभोगरहिता दिवसा यान्ति यस्य वै।**
**स लोहकारभस्त्रेव श्वसन् अपि न जीवति।।**

**अर्थ :** दान आणि उपभोगाशिवाय जो माणूस दिवस घालवितो तो लोहाराच्या यात्याप्रमाणे श्वासोच्छ्वास करतो पण मृत असतो.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. 'अवजड' झालेले माजी मुख्यमंत्री
८. हल्लीच्या युगात याच्याशिवाय नमस्कार नाही!
११. मजबूत
१२. नेत्र, डोळा
१३. रक्षा
१४. प्रजा
१६. काहींसाठी हे निद्रासन
१७. वन्य जीव
१९. घागरा
२१. कलावंत
२२. मोठी टोपली
२३. अर्जुनाचा रथ चालवणारा श्रीकृष्ण
२४. युद्ध
२७. श्री विष्णूचा बटु अवतार
३०. भांडणातील कळीचा मुद्दा
३२. उत्तराधिकारी
३५. बाजार
३६. तोफगाडी
३८. रविवार
४०. अनुमती
४३. सडेतोड, स्पष्ट
४५. कडक व चिवट
४६. वजनदार, हिंदीत पायाभूत उद्योगाला 'भारी' शब्द
४८. स्वयंप्रकाशी किडा
४९. देव
५०. पोते
५२. महान
५३. हद्दपार
५४. गणपतीचे एक नाव
५५. गुजराथी नृत्यप्रकार
५८. विपुलता, रेलचेल
६०. सुसर
६३. श्री विष्णूचा अष्टाक्षरी मंत्र
६७. धाक, भीती
६९. पातक
७०. गाढव
७१. उदार, देणारा
७२. कुळाशी करारमदार
७४. उत्सवाचे दिवस
७५. स्वीकारच्या विरूद्ध
७६. लोण्यासाठी भांडणारा

## उभे शब्द

१. विस्मरण
२. सदोदित
३. संताप, क्रोध
४. भाजणीपासून बटाट्यापर्यंत कुठलाही असला तरी चवदार
५. मंदवासर
६. खोदकाम
७. करंजी
८. सजीव-निर्जीव सर्व
९. महिरप
१०. रड्या माणूस
१५. योग्य, बरोबर
१६. हिंदीत संशय
१८. असंमती
१९. उद्याच्या नंतरचा दिवस
२०. मोठमोठे पराक्रमी योद्धे
२१. हात
२३. मर्यादा
२४. एक तंतुवाद्य
२५. मृत्यू
२६. शिष्य
२८. अपशकुन
२९. बारीक दगड
३०. व्यायाम
३१. सखोल
३३. सूर्याचे एक नाव
३४. प्रश्नोत्तरे
३७. स्वराचे वरदान लाभलेला
३९. कमळ
४०. दिवंगत ज्येष्ठ खलनायिका, ललिता ---
४१. पूर्वज
४२. कवी
४४. मावा
४६. अपमान
४७. भीती
४८. लोखंड घासण्याचे हत्यार
४९. काजळाचा एक प्रकार
५१. बायको
५३. लोकनाट्य
५६. श्री विष्णूचे एक नाव
५७. बगिचा
५९. मजबूत
६१. रात्र
६२. उलट, विरूद्ध
६४. लंकेचा राजा
६५. बाई
६६. सफल झालेला
६८. फणसाचा एक प्रकार
६९. बासरी
७१. दरवाजा
७३. ठोकताळा, अंदाज

## आडवे उत्तर

१.विलासराव देशमुख ८.चमत्कार ११.तगर १२.नयन १३.राख १४.रयत १६.शव-ासन १७.वनचर १९.परकर २१.कलाकार २२.हारा २३.पार्थसारथी २४.समर २७.वामनावतार ३०.कलागत ३२.वारस ३५.हाट ३६.रणगाडा ३८.रविवासर ४०.परवानगी ४३.रोखठोक ४५.वातड ४६.अवजड ४८.काजवा ४९.सुर ५०.बारदान ५२.थोर ५३.तडीपार ५४.हेरंब ५५.रासगरबा ५८.मालामाल ६०.मगर ६३.नारायण नारायण ६७.जरब ६९.पाप ७०.खर ७१.दानी ७२.रयतवारी ७४.सणवार ७५.अस्वीकार ७६.बोका

## उभे उत्तर

१.विसर २.सतत ३.राग ४.वडा ५.शनिवार ६.खनन ७.कानवला ८.चराचर ९.मखर १०.रडराऊत १५.यथार्थ १६.शक १८.नकार १९.परवा २०.रथीमहारथी २१.कर २३.पारावार २४.सतार २५.मरण २६.चेला २८.नाट २९.खडा ३०.कसरत ३१.गहन ३३.रवि ३४.सवालजबाब ३७.गायक ३९.सरोज ४०.पवार ४१.वाडवडील ४२.गीतकार ४४.खवा ४६.अवहेलना ४७.डर ४८.कानस ४९.सुरमा ५१.दारा ५३.तमाशा ५६.रमण ५७.बाग ५९.कणखर ६१.रजनी ६२.विपरीत ६४.रावण ६५.नार ६६.यशस्वी ६८.बरका ६९.पावा ७१.दार ७३.तर्क

# चंदेरी दुनिया



## माझ्या हातात माझ्या मुलीचा जीव गेला, अभिनेत्याच्या पत्नीचा खुलासा; म्हणाली...



मुंबई,-गोविंदाची पत्नी सुनीता आहुजा तिचे विचार स्पष्टपणे मांडत असते. तिच्या व गोविंदाच्या लग्नात अनेक अडचणी आल्या आहेत, परंतु त्या कठीण काळात ती गोविंदाच्या पाठीशी ठामपणे उभी राहिली आहे. आता सुनीताने तिच्या आयुष्यातील एक कठीण आठवण सांगितली. तिने तिच्या दुसऱ्या मुलीचा जन्म आणि मृत्यू याबद्दल सांगितलं.

सुनीताने उषा काकडेशी बोलताना सांगितलं की हा त्यांच्या आयुष्यातील सर्वात कठीण काळ होता. सुनीता म्हणाली, मफ्माझी दुसरी मुलगी प्रिमॅच्युअर होती. ती तीन महिने जगली. तिच्या फुफ्फुसांचा योग्य विकास झाला नव्हता. एके रात्री ती नीट श्वास घेऊ शकली नाही आणि माझ्या हातातच तिचा जीव गेला. माझ्यासाठी हा खूप कठीण क्षण होता. आज मला दोन मुली आणि एक मुलगा अशी तीन अपत्ये असती.फ्फ दुसऱ्या मुलीच्या जन्माबद्दल सुनीता आहुजा म्हणाली.सुनीताने यापूर्वी हॉटरफ्लायला दिलेल्या मुलाखतीत याबद्दल सांगितलं होतं. मफ्ती ८ महिन्यांत जन्मली होती, कारण मी गोविंदाबरोबर खूप प्रवास करत होते. मला काहीच कल्पना नव्हतीष्ठ पहिली प्रसूती सोपी झाली होती, म्हणून मी गृहीत धरलं की दुसरीही अशीच होईल. जड वस्तू उचलू नये हे देखील मला माहित नव्हतं,फ्फ असं सुनीता आहुजा म्हणाली होती.

सुनीता व गोविंदाच्या मुलीचं नाव टीना आहुजा आहे. टीनाच्या जन्मानंतर ८ वर्षांनी त्यांना दुसरा मुलगा झाला. त्याचे नाव यशवर्धन आहे. सुनीताने एकदा तिच्या मुलाच्या जन्माची आठवण सांगितली. गोविंदाला मुलासाठी रडताना पाहून सुनीताने डॉक्टरांना तिच्याऐवजी तिच्या मुलाला वाचवण्यास सांगितलं होतं.मफ्जेव्हा मी माझ्या मुलाला, यशला जन्म देत होते तेव्हा माझे वजन १०० किलो होते. माझे वजन खूप वाढले होते.

## प्रणित मोरे आणि मालती प्रेमात?

मुंबई-बिग बॉसचा १९ वा सीजन आता संपला आहे. पण सध्या सोशल मीडियावर चर्चा सुरू आहे ती बिग बॉसची. गेल्या शंभर दिवसांपासून प्रेक्षकांचे अफाट मनोरंजन करणारा शो संपल्याची रुखरूख प्रेक्षकांना जाणवत आहे. बिग बॉसच्या घरात प्रणित मोरे आणि मालती चहर यांच्यात खूप जवळचा बॉन्ड दिसत असल्याचे चाहत्यांना दिसले. असेही म्हटले जात होते की प्रणित आणि मालतीमध्ये प्रेमाचे नाते तयार होत आहे. दोघेही घरात असताना एकमेकांची मस्करी करताना दिसले. शेवटी भांडतानाही दिसले. मालतीचे एींव्ळलींळेप झाल्याने ती कुणालाही गुडबाय न करता घरातून निघून गेली. ती जाताना प्रणितवरही रागवलेली दिसली. त्यामुळे प्रणितलाही वाईट वाटलं. पण या सगळ्यात चाहत्यांना मात्र उत्सुकता आहे की खरंच प्रणित आणि मालतीमध्ये रोमँटिक नातं तयार झालं होतं का? बिग बॉसचा सिझन संपल्यानंतर प्रणित मोरेनेच या सगळ्या चाहत्यांच्या प्रश्नावर उत्तर दिलं आहे.

## भारतात धुमाकूळ घालणाऱ्या अक्षय खन्नाच्या 'धुरंदर' सिनेमाला ६ देशात



मुंबई-भारतीय सैन्य दलाने केलेल्या एअर स्ट्राईकची कथा मांडणाऱ्या मउरीफ चित्रपटाच्या यशानंतर दिग्दर्शक आदित्य धरच्या धुरंदर सिनेमाची सध्या देशभरात चर्चा सुरू आहे, सोशल मीडियावर या सिनेमाचे (ण्हास्र) रिल्स तुफान व्हायरल झाले असून अभिनेता विनोद खन्नाच्या अभिनयावर चाहते फिदा झाले आहेत.

अवघ्या आठवड्याभरात तब्बल २१८ कोटींच्या कमाईसह या सिनेमानं २०० कोटी क्लबमध्ये दिमाखात एण्ट्री घेतलीय. एकीकडे भारतात या सिनेमावर रसिक भरभरून प्रेम करत असताना आखाती देशात मात्र या सिनेमाला बंदीचा सामना करावा लागतोय.

आखातातल्या सौदी अरेबियासह सहा देशांनी या सिनेमावर बंदी घातलीय. यावर साहजिकच हा प्रश्न पडू शकतो की या सहा देशांनी धुरंधरवर बंदी का घातली? एका शब्दात उत्तर द्यायचं झालं तर पाकिस्तान. या बंदीमागे आहे पाकिस्तान, या सहा देशांच्या सेन्सॉर बोर्डाला हा सिनेमा पाकिस्तानविरोधी नॅरेटिव्ह पसरवणारा आहे, असं वाटलं आणि म्हणून त्यांनी बंदीचा हा निर्णय घेतला. अर्थात पाकिस्तान विरोध करेल अशीच या सिनेमाची गोष्ट आहे. भारताचा एक गुप्तहेर पाकिस्तानात जाऊन एक मिशन यशस्वीपणे राबवतो हे पाकिस्तानला कसं रुचेल?

त्यातूनच मग हे बंदीचं शस्त्र उपसलं गेलं. अर्थात आजवर शाहरुख खान आणि सलमान खानचे अनेक बॉलिवुडपट आखाती देशात भरभरून चाललेत आणि तिथून कोट्यवधींची कमाई झालीय. उदाहरणच द्यायचं झालं तर जवान सिनेमाने इथून १४७ कोटी रुपये कमवले, पठाण ११८ कोटी बजरंग भाईजान ७९ कोटी, दंगल ७४ कोटी, सुलतान सिनेमाने ७२ कोटी कमावले आहेत.

आखाती देशांमधून बॉलिवूडची अशी तगडी कमाई झालीय. अर्थात धुरंधरच्या निर्मितीवेळीच निर्मात्यांना असं काही होईल याचा अंदाज होता. त्यामुळे निर्मात्यांनी त्यानुसारच कमाईचे आकडे गृहित धरले होते. जरी आखाती देशांनी धुरंधरला रोखलं असलं तरी बॉलिवुडपटांचा सर्वात मोठा चाहता असलेल्या भारतात या सिनेमाचा वारू सुसाट धावतोय. येत्या आठवड्यात हा सिनेमा ३०० कोटींचा टप्पा पार करेल असा सिनेसमिक्षकांचा अंदाज आहे. या चित्रपटात रणवीर सिंगचा करिश्मा तर आहेच मात्र सरप्राईज पॅकेज ठरलाय तो रहमान डकैत साकारणारा अक्षय खन्ना. जे यश हिरोच्या भूमिकेनं दिलं नाही, ते व्हिलन बनून वाट्याला येतंय. त्याचा डान्स असेल किंवा मग संवादातून दिसणारा ॲटिट्यूड. अक्षय खन्ना चाहत्यांना प्रचंड आवडतोय. सोशल मीडियातून दिसणारी त्याची क्रेझष्ठ व्हायरल होणारे रील्स हे सगळं प्रेक्षकांना थिएटरपर्यंत येण्यास भाग पाडतंय. त्यामुळंच आखाती देशांनी बंदी घातली असली तरी धुरंधरची जादू कमी होणार नाही, उलट वाढतच जाईल यात शंका नाही.

आखातातल्या सहा देशांनी या सिनेमावर बंदी घातलीय.

बहरीन
कुवेत
ओमान
कतार
सौदी अरेबिया
यूएई

## तमन्ना भाटिया साकारणार व्ही शांताराम चित्रपटातील 'जयश्री' यांची भूमिका!



मुंबई-भारतीय चित्रपटसृष्टीतील दिग्गज व्यक्तिमत्त्व शांताराम राजाराम वणकुद्रे उर्फ व्ही शांताराम यांच्या जीवनकथेला मोठ्या पडद्यावर आणणाऱ्या 'व्ही शांताराम' या भव्य चित्रपटात आता 'जयश्री' या महत्वपूर्ण भूमिकेची पहिली झलक प्रेक्षकांसमोर आली आहे. तमन्ना भाटिया साकारत असलेली ही व्यक्तिरेखा व्ही. शांताराम यांच्या कलात्मक प्रवासात सहकलाकार ते जीवनसाथी असा झालेला सुंदर बदल दाखवणार करणार आहे.तमन्नाच्या कामगिरीचं कौतुक : अभिनेत्री तमन्ना भाटियानं तमिळ, तेलुगू, कन्नड, मल्याळम आणि हिंदी चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयातून वेगळी छाप पाडली आहे. बाहुबली सिनेमात तिनं साकारलेली अवंतिका ही भूमिका तिच्या कारकिर्दीतील महत्त्वाचा टप्पा ठरली. तिनं विविध शैलीतील चित्रपटांत काम केलं असून अलीकडंच 'जी-तेगा इंडिया' आणि 'अरनमनई ४' मधील तिच्या कामगिरीचंही मोठं कौतुक झालं.जयश्री यांचे अनेक पैलू उलगडणार : नव्या पोस्टरमध्ये तमन्ना गुलाबी साडीत अत्यंत मोहक आणि सुसंस्कृत रूपात दिसत आहे. तिच्यातील कलात्मक माधुर्य, नाजूक भावभावना आणि त्या काळाचा सोज्वळपणा पोस्टरमधून स्पष्टपणे जाणवतो. यातून चित्रपटातील समृद्ध मांडणी, भव्य निर्मितीमूल्ये आणि ऐतिहासिक काळाची अप्रतिम मांडणी अधोरेखित होते. या चित्रपटातील 'जयश्री' ही फक्त व्ही शांताराम यांची पत्नी म्हणून नव्हे, तर त्यांच्या आयुष्यातील पहिली प्रेरणा, कलाकृतींमागील मार्गदर्शक शक्ती आणि भावनिक पाठबळ म्हणून चित्रित केली जाणार आहे. अभिनयातील सहप्रवास ते नात्यातील गुंतागुंत, प्रेमाची कोमलता, संघर्ष आणि त्या काळातील चित्रपटविश्वाचा पडद्यामागचा पट या सर्वांचा वेध या भूमिकेतून घेण्यात येणार आहे. प्रेक्षकांना बघायला मिळणार शांताराम आणि जयश्री यांचं नातं : निर्मात्यांनी सांगितल्याप्रमाणे, जयश्री ही अत्यंत सूक्ष्म भावविश्व असलेली व्यक्तिरेखा आहे. तमन्ना भाटियाच्या नजाकतपूर्ण व्यक्तिमत्त्वामुळं त्या काळातील स्त्रीचं तेजस्वी अस्तित्व पडद्यावर प्रभावीपणे जिवंत होतं. तिच्या अभिव्यक्तींमधील खोली आणि सहजतेमुळं ही भूमिका अधिक उठून दिसते.

## बॉक्स ऑफिसवर धुरंधरचा धमाका!

मुंबई,१२ डिसेंबर - गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आलेला रणवीर सिंग, अक्षय खन्ना आणि संजय दत्त यांची प्रमुख भूमिका असलेला मधुरंधरफ हा चित्रपट बॉक्स ऑफिसवरही धुमाकूळ घालत आहे. अवघ्या एका आठवड्यातच या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला आहे. या चित्रपटाचे कलेक्शन केवळ भारतातच नाही तर परदेशातही विक्रम केला आहे. धुरंधर प्रदर्शित होण्यापूर्वी धनुष आणि कृती सेनन स्टारर मतेरे इश्क मेंफ हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर आला होता, पण ५ डिसेंबर रोजी धुरंधर प्रदर्शित होताच त्याने बॉक्स ऑफिसवर कब्जा केला. या चित्रपटाने भारतात फक्त सात दिवसांत २०० कोटींहून अधिक कमाई केली आहे. जगभरातील त्याचे कलेक्शनही आश्चर्यकारक आहे.खऱ्या घटनांनी प्रेरित होऊन बनवलेल्या धुरंधर या चित्रपटाला प्रेक्षक आणि समीक्षकांकडून प्रचंड प्रेम मिळत आहे, हे चित्रपटाच्या कलेक्शनवरून स्पष्टपणे दिसून येते. पहिल्याच दिवशी देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर २८ कोटी रुपयांची कमाई करणाऱ्या धुरंदरची कमाई दिवसेंदिवस वाढत आहे.

पहिला दिवस - २८ कोटी
दुसरा दिवस - ३२ कोटी
तिसरा दिवस - ४३ कोटी
चौथा दिवस - २४.३० कोटी
पाचवा दिवस - २८.६० कोटी
सहावा दिवस - २९.२० कोटी
सातवा दिवस - २९.४० कोटी

आता, चित्रपटाच्या वर्ल्डवाइड कलेक्शनबद्दल बोलायचे झाले तर, धुरंधर परदेशी थिएटरमध्येही हिट ठरला आहे. या चित्रपटाने फक्त ७ दिवसांत जगभरात ३०० कोटींपेक्षा जास्त कमाई केली आहे. सॅकनिल्कच्या मते, धुरंधरचा जगभरातील कलेक्शन आतापर्यंत ३०६.२५ कोटी (यूएस ञ्१.२ दशलक्ष) आहे. अधिकृत आकडेवारी यापेक्षा जास्त किंवा कमी असू शकते.

धुरंधरची कथा सत्य घटनांनी प्रेरित आहे. हा चित्रपट कराचीतील ल्यारी परिसराभोवती फिरतो, जो एकेकाळी पाकिस्तानचा सर्वात धोकादायक गुन्हेगारीचे केंद्र मानला जात होता हा चित्रपट भारतातील बॉम्बस्फोट आणि लियारी गँग, राजकारण आणि पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद यांच्यातील संबंधांचा शोध घेतो. अक्षय खन्ना दरोडेखोर रेहमानच्या भूमिकेत आपली एक वेगळीच छाप पाडताना दिसतो. या चित्रपटात रणवीर सिंग, संजय दत्त, आर माधवन आणि अर्जुन रामपाल हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकेत आहेत.






## प्रसिद्ध अभिनेत्याचा मुंबईत भीषण अपघात

मुंबई -लोकप्रिय टीव्ही अभिनेता जीशान खान यांचा मुंबईतील वर्सोवा भागात भीषण अपघात झाला आहे. 'कुमकुम भाग्य' आणि 'बिग बॉस' सारख्या शोमुळे घराघरात ओळख निर्माण केलेल्या या अभिनेत्याच्या कारचा ८ डिसेंबर २०२५ रोजी रात्री जोरदार अपघात झाला. सुदैवाने जीशान सुरक्षित असून त्याला कोणतीही गंभीर दुखापत झालेली नाही, मात्र त्यांच्या कारचे मोठे नुकसान झाले आहे.

अपघात कसा झाला?

'बॉलिवूड बबलने दिलेल्या माहितीनुसार, ८ डिसेंबर रोजी रात्री ८.३० वाजता मुंबईच्या वर्सोवा परिसरात त्याची काळी कार आणि एक ग्रे रंगाची कार समोरासमोर धडकली. धडकेत दोन्ही गाड्यांचे मोठे नुकसान झाले असून, एअरबॅग्स तात्काळ उघडल्यामुळे झीशानचे प्राण वाचले. अपघातानंतर तो सुरक्षित आहे, मात्र धक्क्यात असून वैद्यकीय तपासणी सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. गाडीचा पुढील भाग पूर्णपणे मोडून पडल्याचे दिसून आले. अपघातानंतर जीशान तात्काळ जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवण्यासाठी गेले. मात्र तक्रार नोंद झाली आहे की नाही, याबाबत अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही. जीशान खानचे करिअरजीशान खानने २०१९ ते २०२१ दरम्यान 'कुमकुम भाग्य' मालिकेत आर्यन खन्ना ही भूमिका साकारून लोकप्रियता मिळवली. त्यानंतर तो 'नागिन ६', 'लॉक अप''सारख्या प्रोजेक्ट्समध्ये दिसला. तसेच तो 'बिग बॉस ध्ऊऊ सीझन १'चा भाग राहिला होता. त्याच्या खेळामुळे आणि वागण्यामुळे त्याने प्रेक्षकांचे लक्ष वेधले होते.

## ब्रोकन मेजेस सादर करण्यासाठी शबाना आझमी थेट लंडनवरुन मुंबईत



मुंबई-अभिनेत्री शबाना आझमी नोव्हेंबरपासून युनायटेड किंग्डममधील वॉस्टरशायरमध्ये एका इंग्रजी चित्रपटाचं चित्रीकरण करत आहेत. त्यांनी क्वीन मेरी स्कूलच्या कार्यक्रमाला येण्यासाठी चित्रपटाच्या शूटिंगचं वेळापत्रक बदललं. नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स (एनसीपीए) इथं होणाऱ्या शाळेच्या शतकोत्तर समारंभासाठी त्या वेळेत भारतात दाखल झाल्या. त्यांनी दिवंगत अलेक पदमसी दिग्दर्शित मब्रोकन इमेजेसफ हे नाटक सादर केलं. त्यानंतर इंग्लंडमध्ये सुरू असलेल्या चित्रीकरणासाठी रवाना झाल्या.

मफ्या जगात मी आज रात्रीचा कार्यक्रम कधीच चुकवला नसता. वन्स ए क्वीन मेरियन अलवेज क्वीन मेरियनफ्फअसं शबाना आझमी म्हणाल्या. यानंतर त्यांनी शाळेचं गाणं म्हणायला सुरुवात केली. तेव्हा प्रेक्षकांमधील सर्वजण त्यांच्यासोबत गाणं म्हणत उभे राहिले. एनसीपीएमध्ये संध्याकाळी क्वीन मेरी शाळेच्या माजी विद्यार्थिनी, पत्रकार आणि लेखिका शोभा डे यांचं भाषण झालं. त्यांनी बोलताना सांगितलं, मफ्शाळेत बंडखोर असल्यानं खूप शक्तिशाली बनले. शाळेनं मला शिस्त शिकवली आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे मी या संस्थेत राणीचं इंग्रजी शिकले.फ्फ क्वीन मेरी शाळेच्या माजी विद्यार्थी संघटनेनं एक गायन, शायना एनसी यांचा फॅशन शो आणि जमात आर्ट गॅलरीच्या संस्थापक प्रविणा मेक्लाई यांनी डॉ. शिरीन इराणी (महिला आरोग्य समस्यांचे सल्लागार), जलतरणपटू पर्सिस मदन वाचा, देविता सराफ (वू टेलिव्हिजनच्या संस्थापक) आणि रिया दांडिकोर्ला यांच्यासोबत चर्चा आयोजित केली होती.

### क्वीन मेरी स्कूलची १५० वर्ष

अशी झाली शाळेची सुरूवात : मफ१८७५ दरम्यान भारतात काम करणारे ब्रिटिश डॉक्टर जेव्हा इंग्लंडला गेले तेव्हा त्यांनी लेडी मेरी किनायर्ड यांना भारतात स्त्रियांच्या मृत्यूचं प्रमाण जास्त असल्याचं सांगितलं. त्याला कारण भारतातील बुरखा पद्धत असून भारतीय महिला आजारी पडल्या तरी कोणत्याही पुरुष डॉक्टरनं हात लावू नये, अशीच भारतीयांची मानसिकता असल्यानं आजार बळावतो. त्यामुळं महिलांचा मृत्यू होतो. गरोदरपणातदेखील आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण झाल्यानं त्यांच्या मृत्यूचं प्रमाण जास्त असल्याचं डॉक्टरांनी लेडी मेरी किनायर्ड यांना सांगितलं. यावर उपाय म्हणून आपण भारतातील मुलींना शिकवून त्यातून डॉक्टर निर्माण केले पाहिजेत, असा विचार लेडी मेरी किनायर्ड यांनी केला. यानंतर त्यांनी त्यांच्या पतीच्या मदतीनं देणग्या गोळा करण्यास मदत केली. त्यानंतर हॅरीयेट बट यांच्या सहकार्यानं झेनाना बायबल अँड मेडिकल मिशन अंतर्गत सुरू केलेल्या या शाळेनं शिक्षणाचा हा अखंड महायज्ञ सुरू केला. गुरुबाई करमरकर, सुंदरबाई पवार आणि निकांबे या शाळेच्या पहिल्या तीन विद्यार्थिनी होत्या,फ्फ असं शाळेच्या प्रिन्सिपल ग्रेस मॅथियस यांनी सांगितलं.

तीनवेळा बदललं शाळेचं नाव : सर्वात आधी शाळेचं नाव बॉम्बे इंडियन फिमेल नॉर्मल स्कूल होतं. त्यानंतर गिरगाव गर्ल्स हायस्कूल असं शाळेचं नाव केलं गेलं. क्वीन मेरी यांनी १९११ साली शाळेला भेट दिली. त्यावेळी क्वीन मेरी यांच्या नावावरून त्यांच्या परवानगीनं १९१४ साली शाळेचं नाव क्वीन मेरी स्कूल असं करण्यात आलं. या शाळेत दिवंगत सुरैया, नर्गिस दत्त, अझीम प्रेमजी यांच्या पत्नी यास्मिन प्रेमजी, शबाना आझमी, शोभा डे, सूनी तारापोरवाला, उद्योगपती उर्वी पिरामल, देविता सराफ आणि कल्पना सिंघानिया अशा नामवंत माजी विद्यार्थिनींचा समावेश आहेत.

सध्या शाळा ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणाहून काही अंतरावर सुप्रसिद्ध काँग्रेस हाऊस आहे. या काँग्रेस हाऊसला अनेक काँग्रेस नेत्यांनी भेट दिली आहे. याच काँग्रेस हाऊसला पंडित जवाहरलाल नेहरू नेहमी भेट देत असत. तसंच इथं महात्मा गांधी यांनी देखील वास्तव्य केलं होतं. त्याशिवाय तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी शाळेसमोरच असलेल्या एका जागेत मुंबई संगीत कलाकार मंडळ याअंतर्गत उत्तर भारतातील मुजरे करणाऱ्या महिलांना आश्रय देत त्यांचं पुनर्वसन केलं होतं. मात्र, त्याप्रकाराला नंतर वेगळं वळण लागून तिथं रेडलाईट एरिया सदृश्य परिस्थिती निर्माण झाली. असं असलं तरी मुली शाळेत सर्वाधिक सुरक्षित आहेत. विद्यार्थिनी बाहेरच्या कसल्याही वातावरणाकडं दुर्लक्ष करत आपलं शिक्षण पूर्ण करू शकतात हा आत्मविश्वास शाळेनं निर्माण केला, असं सांगण्यात आलं. मफ्अगदी लहान वयातच आम्हाला शाळेच्या परिसरात अनेक गंगूबाई दिसल्या. त्यामुळं आम्हाला वास्तवाची ओळख झाली आणि जीवनासाठी तयार होण्यास मदत झाली. आमच्या शाळेबद्दल काही वेगळे पैलू होते जे शहरातील इतर शाळांमध्ये दिसत नव्हते. आमची शाळा कदाचित एकमेव शाळा असेल जिथं पालकांना मुलीच्या जन्माच्या दिवशी तिचं नाव नोंदवायला लागायचं. या शाळेनं आम्हाला खूप काही शिकवलं आहे. ज्यामुळं आम्हाला अधिक जागरूक आणि सहानुभूतीशील मानव बनण्यास मदत झाली,फ्फ असं माजी विद्यार्थिनी दीपा मेहता यांनी सांगितलं.. मुंबई दंगलींमध्येही शाळा सुरू होती. त्यावेळी अनेक मुली शाळेत चालत जात होत्या. १८९६ ला मुंबईत प्लेगची साथ आली होती. त्यावेळी शहराचा बराचसा भाग बंद होता तेव्हाही शाळा सुरू होती, असं असं शाळेच्या प्रिन्सिपल ग्रेस मॅथियस यांनी सांगितले.

# माजी गृहमंत्री आणि काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली



## रद्द झालेली जन्म-मृत्यू प्रमाणपत्राची मुळ प्रत १६ डिसेंबर २०२५ पूर्वी वापस जमा करणे बाबत

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाने सप्टेंबर २०२३ ते जानेवारी २०२५ या कालावधीत तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी या पदापेक्षा कमी दर्जाच्या अधिकाऱ्याने विलंबीत जन्म-मृत्यूच्या घटनेची नोंद घेण्यासाठीचे दिलेले सर्व आदेश व या आदेशाच्या आधारे दिलेले जन्म-मृत्यू प्रमाणपत्र रद्द केलेले आहेत.

लातूर मनपा क्षेत्रात या कालावधीत एकूण १६७७ विलंबीत जन्म-मृत्यू प्रमाणपत्रे निर्गमीत करण्यात आली होती. या कालावधीत सदरील विलंबीत जन्म-मृत्यू प्रमाणपत्रे रद्द करण्यात आली असल्याचे व सदरील जन्म-मृत्यू प्रमाणपत्र मनपा कार्यालय कींवा तहसील कार्यालय येथे जमा करणे बाबत यापूर्वी वेळोवेळी सूचन देण्यात आल्या आहेत तसेच तहसील कार्यालय, मनपा कार्यालयाचे कर्मचारी यांनी घरोघरी जावून भेटी देवून माहिती दिलेली आहे. तथापि अद्याप बऱ्याच नागरिकांनी त्यांची मुळ जन्म-मृत्यू प्रमाणपत्रे अद्याप जमा केलेली नाहीत. तसेच कांही नागरिकांनी झेरॉक्स प्रत जमा केलेली आहे.

शासन निर्णय दि.१६ सप्टेंबर २०२५ नुसार प्रमाणपत्र वापस जमा करण्यासाठी ३ महिन्याची मुदत देण्यात आली होती व सदरील मुदत मंगळवार १६ डिसेंबर २०२५ रोजी संपत आहे. ज्या नागरिकांनी त्यांची रद्द झालेली मूळ जन्म-मृत्यू प्रमाणपत्रे वापस जमा केलेली नाहीत अश्या प्रमाणपत्रधारकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे शासनाकडून सुचना प्राप्त झाल्या आहेत.

तरी ज्या नागरिकांनी त्यांची रद्द झालेली मूळ जन्म-मृत्यू प्रमाणपत्रे अद्याप वापस जमा केली नाहीत तसेच ज्या नागरिकांनी यापूर्वी फक्त झेरॉक्स प्रत सादर केली आहे अश्या सर्व संबंधीत नागरिकांनी मंगळवार दि.१६ डिसेंबर २०२५ पूर्वी रद्द मूळ प्रमाणपत्रे तहसील कार्यालय येथे जमा करावी व कायदेशीर कार्यवाही टाळावी असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

## मध्य रेल्वेच्या आरपीएफने उल्लेखनीय तपास कौशल्ये दाखवत केवळ ३ दिवसांत चोरीचा गुन्हा उघडकीस आणला

**मुंबई/प्रतिनिधी :** तपासातील उत्कृष्टता आणि तांत्रिक कौशल्याचे उल्लेखनीय प्रदर्शन करत, मध्य रेल्वेच्या रेल्वे सुरक्षा दलाने () अवघ्या ३ दिवसांत चोरीचा गुन्हा यशस्वीपणे उघडकीस आणला आहे.

दि. २०.०९.२०२५ रोजी जळगाव जवळ गाडी क्रमांक १२१६७ लोकमान्य टिळक टर्मिनस - बनारस एक्सप्रेसमध्ये चोरीची घटना घडली. एका महिला प्रवाशाच्या पर्समधील अंदाजे रु ३,००,००० किमतीचे सोन्याचे दागिने चोरीस गेले. या प्रकरणाची नोंद जीआरपी भुसावळ/जळगाव येथे करण्यात आली.

सहाय्यक उपनिरीक्षक आणि पोलिस शिपायांचा समावेश असलेल्या आरपीएफ च्या विशेष पथकाने हा गुन्हा उघडकीस आणत मुख्य आरोपी महेश लिंगायत याला केवळ ३ दिवसांत म्हणजेच २३.९.२०२५ रोजी अटक केली. चौकशीदरम्यान आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली तसेच २६.१२.२०२४ रोजी गाडी क्रमांक १२९०५ पोरबंदर शालीमार एक्सप्रेसमध्ये झालेल्या आणखी एका चोरीच्या प्रकरणातील सहभागाची माहिती दिली. यामध्ये प्रवाशाच्या पिशवीतील ९,६४,४००/- रुपये किमतीचे दागिने चोरीस गेले होते. या प्रकरणाची नोंदही जीआरपी भुसावळ/जळगाव येथे झाली होती. त्यानंतर आरपीएफ च्या मदतीने जीआरपीने ने आणखी दोघा आरोपींना राजकुमार विश्वकर्मा आणि मनोज जाधव यांना अटक केली. या तिघांविरुद्ध भारत न्याय संहिता कलम ३०५() अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला.


आरपीएफ च्या पथकांनी जीआरपीने सोबत मिळून उत्कृष्ट शोधक कौशल्य, अचूक गुप्त माहिती विश्लेषण, नजर ठेव तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि समन्वयपूर्ण टीमवर्क दाखवत दोन्ही प्रकरणे यशस्वीपणे उकलली. ही प्रकरणे मध्य रेल्वे आरपीएफ च्या व्यावसायिकता, सचोटी आणि तांत्रिक प्रावीण्याचे प्रतीक ठरतात.

मध्य रेल्वे प्रवाशांना विनंती करते की, त्यांनी आपल्या सामानाची काळजी घ्यावी आणि कोणतीही गैरप्रकाराची घटना घडल्यास साहाय्यासाठी १३९ वर संपर्क साधावा.



## राजकारणात राहूनही निष्कलंकपणे कार्य करता येते हा आदर्श चाकूरकरांनी घालून दिला - आ. कराड

**लातूर/प्रतिनिधी :** लातूरचे भूमिपुत्र अभ्यासू, शांत, संयमी, सुसंस्कृत, इस्तबद्ध, अध्यात्मिक आणि तत्वनिष्ठ राजकारणातील निष्कलंक व्यक्तिमत्व देशाचे माजी गृहमंत्री शिवराजजी पाटील चाकूरकर साहेब यांच्या दुःखद निधनाची बातमी वेदनादायी असून त्यांच्या निधनाने लातूरच्या राजकारणातील पित्रतुल्य व्यक्तिमत्व आपल्यातून निघून गेले आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणार नाही असे लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले.



लातूर नगरपालिकेचे नगराध्यक्ष, आमदार, विधानसभा उपाध्यक्ष, लोकसभेचे अध्यक्ष, केंद्रीय मंत्रिमंडळातील गृहमंत्रीपदासह विविध विभागाची यशस्वीरित्या जबाबदारी सांभाळणारे शिवराज पाटील चाकूरकर साहेब यांनी पंजाबचे राज्यपाल म्हणून कार्य केले. गांधी परिवारातील निकटवर्तीय अशी ओळख जरी असली तरी त्यांचे सर्वच पक्षातील नेत्यांशी सलोख्याचे संबंध होते विविध समाजात त्यांच्याबद्दल एक वेगळे आदराचे स्थान होते.

राजकीय जीवनात व्यक्तिगत हितापेक्षा देशहिताला शिवराज पाटील चाकूरकर यांनी प्राधान्य दिले. सहा दशके राजकीय कारकीर्दीत त्यांनी भ्रष्टाचाराचा एकही डाग लागू दिला नाही. आयुष्यभर राजकारणात राहूनही निष्कलंकपणे कार्य करता येते हा आदर्श त्यांनी घालून दिला आहे. लातूर जिल्ह्याच्या विकासात त्यांचे मोठे योगदान असूनही हे माझ्यामुळे झाले असे त्यांनी कधीच बोलून दाखवले नाही किंवा श्रेय घेण्याचा प्रयत्नही केला नाही. चाकूरकर साहेबांचे कराड कुटुंबियांचे जिव्हाळ्याचे संबंध होते विशेषता शिवराजजी चाकूरकर साहेब आणि विश्वधर्मी डॉ. विश्वनाथजी कराड साहेब यांचे राष्ट्रीय एकात्मता आणि देशहिताच्या अनुषंगाने त्यांच्यात सातत्याने चर्चा होत होती. लातूरच्या राजकारणातील मार्गदर्शक पितृतुल्य व्यक्तिमत्व शिवराज पाटील चाकूरकर यांच्या रूपाने आपल्यातून निघून गेले. चाकूरकर परिवाराच्या दुःखात कराड परिवार सहभागी असल्याची भावना लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी व्यक्त केली.

## माजी गृहमंत्री आणि काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर साहेब यांना भावपूर्ण श्रद्धांजली

**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय लोकशाही व्यवस्थेला शांत,संयमी नेतृत्व प्रदान करणारे आदरणीय श्री. शिवराज पाटील चाकूरकर साहेब यांचे निधन अत्यंत दुःखद घटना आहे. त्यांच्या जाण्याने राजकारणातील एक सुसंस्कृत व मूल्यनिष्ठ अध्याय समाप्त झाला आहे.



त्यांनी आपल्या दीर्घ राजकीय कारकिर्दीत विविध जबाबदाऱ्या अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडल्या आहेत. संसदेत त्यांच्या वागणुकीत आणि विचारमंथनात एक आदर्श राजकीय संस्कृतीचे दर्शन घडत असे.त्यांच्या जाण्याने सुसंस्कारित आणि राष्ट्रीय हिताचा विचार अग्रस्थानी ठेवणारा नेता गमावला आहे;

या कठीण प्रसंगी चाकूरकर कुटूंबियांच्या दुःखात मी सहभागी असून ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती प्रदान करो ही प्रार्थना!

(अशा शब्दात दिवंगत नेते शिवराज पाटील चाकूरकर साहेब यांच्या प्रती भावपूर्ण श्रद्धांजली माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी व्यक्त केली आहे.)

## ग्रंथालय मागण्या संदर्भात मुख्यमंत्री सकारात्मक : सदाशिव बेडगे

### मोर्चास शिवसेना उपनेत्या शुभांगी पाटील यांचा पाठिंबा

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे यांनी ११ डिसेंबर ला मोर्चात सहभागी होण्यासाठी या ऐतिहासिक इतिहासचे साक्षीदार होण्यासाठी महाराष्ट्रातील ग्रंथालय कर्मचारी यांना दिलेल्या हाकेला ३००० पेक्षा जास्त संख्येने सहभागी झाले. यासाठी परिषदेचे गंगाधर पोतंगले, विद्यासागर हणमंते, संतोष करमले,सौ.उमा पुदाले, निलेश क्षिरसागर मनोहर गायकवाड,केशव वनंजे, बालाजी कांगणे आदीने खूप परिश्रम घेतले. ग्रंथालय प्रलंबित मागण्या सोडविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यासाठी यशवंत स्टेडियम येथून विधान भवन वर मोर्चा काढण्यात आल्याचे महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे यांनी सांगितले.



या मोर्चात नाशिक येथील ग्रंथालय चळवळीतील उदध्व ठाकरे शिवसेना उपनेत्या शुभांगी पाटील यांनी मोर्चात येऊन पाठिंबा देऊन सहभागी झाल्या. यावेळी त्यांनी ग्रंथालय कर्मचारी यांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले.

आमच्या मागण्या संदर्भात मागण्यांचे निवेदन कुणाला द्यायचे आहे हे प्रशासनातील अधिकारी यांनी विचारले असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच निवेदन देण्यात येईल असे सांगितले. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्याशी चर्चा केल्यानंतर आम्हाला निरोप आला. आपण ना.चंद्रकांत दादा पाटील यांना निवेदन देण्यास तयार आहात का ? आम्ही हो म्हटल्यावर सदाशिव बेडगे, सिद्राम मुद्देबिहाळ, मनोहर गायकवाड, श्रीधर स्वामी, विनोद गायकवाड हे पाच जणांचे शिष्टमंडळ विधानभवन मध्ये निवेदन देण्यास गेले असता मंत्री चंद्रकांतदादा पाटील अतिशय चांगल्या मूडमध्ये होते. यावेळी त्यांनी सांगितले की, आपले निवेदन शासनास अगोदर पोहोचल्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या मागण्या संदर्भात सकारात्मक आहेत. त्याबाबत आपल्या शिष्टमंडळासोबत लवकरच बैठक आयोजित करण्यात येईल. ४० टक्के अनुदान वाढ, दर्जा बदल लवकरच आदेश काढण्यात येतील, असे सांगितले असल्याचे सदाशिव बेडगे यांनी मोर्चातील उपस्थितांना सांगितले.

यावेळी सुनिलदत्त पाटील,धोंडिराम जेवूरकर, नरसिंह मिसालोलू, रामचंद्र वग्गे, गिरीश मठपती, सौ.वैशाली दुरुगकर,महाराष्ट्रातून बहुसंख्येने कर्मचारी महिला व बंधू उपस्थित होते.

आ.सुधीर मुनगंटीवार व आ.अभिजित वंजारी यांच्या नेतृत्वात मोर्चा काढण्यात येणार होता. पण विधानभवन मध्ये महत्वाच्या कामकाजामुळे येता आले नाही. त्यांनी मला अगोदरच पूर्व सूचना दिलेली होती. ११ डिसेंबर तारीख बदलण्याबाबत चर्चा केली होती, पण ११ डिसेंबरची मोर्चाची परवानगी घेतली होती आणि काही जणांनी रेल्वे रिझर्वेशन केल्यामुळे तारीख बदलली नाही. दोघांनी मला शब्द दिला आहे की, शासन स्तरावर सर्वतोपरी सहकार्य करून आपणांस आपल्या मागण्या संदर्भात न्याय मिळवून देण्यात येईल , असे सांगितले असल्याचे सदाशिव बेडगे यांनी म्हटले आहे.

## लोकनेते स्व. मुंडे साहेब यांच्यासोबत काम केलेल्या भाजपाच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा रेणापूर येथे सन्मान

# आयुष्यभर मुंडे साहेबांनी जनहितासाठी संघर्ष केला - ऋषिकेश कराड

**लातूर/प्रतिनिधी :** आयुष्यभर शेतकरी, कष्टकरी, गोरगरीब, सर्वसामान्य माणसाच्या हितासाठी न्याय हक्कासाठी संघर्ष करणारे लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंतीदिनी १२ डिसेंबर शुक्रवार रोजी भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते मुंडे साहेबांसोबत राहून कष्टाने, मेहनतीने भारतीय जनता पार्टी वाढवण्यासाठी काम केलेल्या रेणापूर येथील भाजपाच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.




रेणापूरचे तत्कालीन आमदार, मराठवाड्याचे भूमिपुत्र, महाराष्ट्राचे लोकनेते केंद्रीय माजी ग्रामविकास मंत्री स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांची जयंती रेणापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे १२ डिसेंबर २०२५ शुक्रवार रोजी भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरी करण्यात आली. यावेळी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले, मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले, शरद दरेकर, जिल्हा चिटणीस दशरथ सरवदे, रेणापूरचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, वसंत करमुडे, श्रीकृष्ण पवार, शहराध्यक्ष अच्युत कातळे, भाजयुमो शहराध्यक्ष गणेश चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांसोबत प्रत्येक कार्यात सहभागी होऊन भाजपाच्या विस्तारासाठी खांद्याला खांदा लावून काम करणारे रेणापूर शहरातील काशिनाथ पाटील, अंबादास राठोड, सूर्यकांत मोटेगावकर, जयप्रकाश हलकुडे, बापूसाहेब कुलकर्णी, गंगाधर पाटील, नागुबाई आलापुरे, किशोर सोमाणी, ईश्वर मंत्री, एकनाथ आकनगिरे, चंद्रकांत कातळे, पंचाक्षरी गिरवलकर, दिनकर राठोड, लिंबराज गायकवाड, लक्ष्मण इंगे, रविकांत औसेकर, उत्तम घोडके, नरहरी डावळे, सुधीर तोडकरी, अंगद कातळे, रमाकांत वाघमारे, विठ्ठल औसेकर, शेख शहेनशाह, दिलीप राजे, शिवाजी भावे, सत्यपाल राऊत, दिलीप आकनगिरे, सुरेश खोबरे, सुभाष राठोड, रावसाहेब कातळे, रमेश वरवटे, अमृतेश्वर स्वामी, दत्ता बाळे, शेख खुदूस, राजकुमार रायवाडे, हनुमंत भालेराव, साताप्पा खोबरे, नंदकुमार बंडे, रमेश काळे, जगन्नाथ कातळे, रावसाहेब चव्हाण, नागनाथ कांबळे, मधुकर माळेगावकर, धनंजय वाघे, गोविंद कुडके, रंगनाथ एकुरके, बळीराम राठोड, गोपीदादा आकनगिरे, गोविंद काळे, ज्ञानोबा सातपुते, दगडू भिकाने, बालाजी ईस्ताळकर यांचा भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा कराड यांच्या हस्ते शाल तुळशीचे रोपटे आणि सन्मानचिन्ह भेट देऊन यथोचित सत्कार केला. या सन्मान सोहळ्यास अडचणीमुळे काहींना उपस्थित राहता आले नाही अशांना त्यांच्या निवासस्थानी जाऊन सन्मान करण्याचा रेणापूर शहर भाजपाने यावेळी जाहीर केले. देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांना यावेळी भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली.

अटलजी - अडवाणी आणि महाजन - मुंडे यांनी भाजपाचे रोपटे लावले. रेणापूरसह राज्यातीलच नव्हे तर देशभरातील हजारो लाखो कार्यकर्त्यांनी जिद्दीने, कष्टाने काम करून भाजपाचे रोपटे जोपासले. कमी काळात भाजपाचा आज वटवृक्ष झाला. जुन्या काळातील कार्यकर्त्यांच्या त्यागातून भाजपा यशोशिखरापर्यंत पोहोचविला असे सांगून यावेळी बोलताना ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांनी अनेक वर्ष रेणापूर विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधित्व केले मतदार संघाच्या विभाजनानंतर रेणापूर भाग लातूर ग्रामीण मतदार संघात समाविष्ट झाला. मुंडे साहेबांनी रमेशआप्पा यांच्यावर मतदार संघाची जबाबदारी सोपवली तेंव्हापासून लातूर ग्रामीण मध्ये कमळ फुलले पाहिजे सातत्याने संघर्ष केला आणि कार्यकर्त्यांची ही इच्छा यावेळी पूर्ण झाली असल्याचे सांगून भाजपा हा कार्यकर्त्याचा पक्ष आहे मुंडे साहेबांसोबत काम केलेल्या सर्वच जुन्या कार्यकर्त्यांचा सातत्याने मान सन्मान झाला पाहिजे असे बोलून दाखवले.

प्रारंभी रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे यांनी आपल्या प्रस्ताविकातून कार्यक्रमाच्या आयोजनामागची भूमिका विषद केली चंद्रकांत कातळे यांनी सूत्रसंचालन केले तर ॲड. दशरथ सरवदे यांनी उपस्थित यांचे आभार व्यक्त केले या कार्यक्रमास रेणापूर आणि परिसरातील भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कृषी महाविद्यालयात जागतिक मृदा दिन उत्साहात साजरा



धाराशिव (प्रतिनिधी)- व्ही. पी. शैक्षणिक संकुल छत्रपती संभाजी नगर रोड, धाराशिव येथील श्री साई जनविकास कृषि महाविद्यालयमध्ये डॉ. प्रतापसिंह पाटील व करण प्रतापसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक मृदा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

. सर्व प्रथम घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात मृदा पूजन करून करण्यात आली. मृदा संवर्धन ही काळाची गरज असून शाश्वत शेतीसाठी सुपीक जमिनीचे रक्षण अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन प्रमुख पाहुण्या सीमा सय्यद यांनी आपल्या मार्गदर्शनातून केले.तसेच त्यांनी आपल्या प्रेमा गो पालन शेतकरी उत्पादक कंपनीची माहिती दिली. सुवर्णा घाडगे यांनी सेंदिय शेतीचे महत्व सांगितले. कृषि सहाय्यक सुषमा काळे यांनी शासनाच्या वेगवेगळ्या योजणाची माहिती दिली. मृदा शास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. पल्लवी घोडके यांनी माती पाणी परीक्षनाचे महत्व व खत व्यवस्थापन या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले . डॉ. अमित गांधले यांनी मृदा आरोग्य संवर्धन, सेंद्रिय शेती, खत व्यवस्थापन, माती परीक्षणाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी मृदा आरोग्य कार्ड उपक्रमाबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात येत शाश्वत कृषी पद्धती अवलंबण्याचे आवाहन करण्यात आले.जागतिक मृदा दिनानिमित्त आयोजित हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक व प्रेरणादायी ठरला.

या कार्यक्रमास कृषि महाविद्यालयाचे व्यवस्थापक प्रा हरी घाडगे, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,इतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुनील भालेकर यांनी केले तर आभार डॉ. सागर बुरगुटे यांनी मानले.

# सोयाबीन बारदाण्यासाठी तरुण रस्त्यावर



धाराशिव (प्रतिनिधी)- जिल्ह्यात दि. १६ नोहेंबरपासून सुरू झालेली सोयाबीन खरेदी अवघ्या १५ दिवसांत बारदाण्याअभावी बंद पडली. नोंदणीचे किचकट दिव्य पार करूनही सोयाबीनची खरेदी होत नाही. कधी खरेदी होणार हे माहिती नाही, त्यामुळे वैतागलेल्या शेतकऱ्यांसह धाराशिव युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी आंदोलन केले. बारदान्याचा पेहराव घालून शेतकऱ्याने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत लक्ष वेधून घेतले. केंद्र सरकारने सोयाबीनला २०२५-२६ वर्षात ५,३२८ रुपये हमीभाव जाहीर केला आहे. बहुतांश शेतकऱ्याचे सोयाबीनवर अर्थकारण आवलंबून असल्याने सोयाबीन हे खरीपातील महत्त्वाचे पीक आहे. सध्या खुल्या बाजारात ४५०० ते ४६०० रुपये प्रतिक्विंटल दराने खरेदी केले जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची होणारी लूट थांबवण्यासाठी युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी गुरुवारी दुपारी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांची भेट घेतली. यावेळी हमीभाव खरेदी केंद्रांना तत्काळ बारदान उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी केली. या वेळी सर्फराज काझी, प्रशांत झेंडे, विजयसिंह घोगरे, संकेत पडवळ, संजय खांडवे उपस्थित होते. जिल्ह्यात आतापर्यंत नोंदणी केलेल्या १९३० शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी झालेली आहे. जिल्ह्यात १९ केंद्रांवर ४१,०२४ क्विंटल सोयाबीनची खरेदी झाली आहे. आता नोंदणी करूनही बारदाना नसल्याने केंद्र बंद आहेत.

# धाराशिव जिल्ह्यात महावितरण कार्यालयातील एका अधिकाऱ्यासह तिघे एबीसीच्या जाळ्यात

धाराशिव(प्रतिनिधी)-महावितरणमध्ये कार्यरत असलेल्या दोन कर्मचाऱ्यांची बदली करण्यासाठी तीस हजार रुपयांची लाच घेणाऱ्या एका अधिकाऱ्यासह दोन लिपिकांवर लाचलुचपत विभागाने कारवाई केली आहे. ही कारवाई बुधवारी दुपारी करण्यात आली. विशेष म्हणजे, यातील तिघांनाही ८० हजार ते दीड लाख रुपयांपर्यंत वेतन आहे. याच कर्मचाऱ्यांनी अनेकांच्या नियमानुसार होणार असलेल्या बदल्याही अडवल्याचे समजते. या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशीची गरज आहे.

महावितरणमध्ये लाईनमन पदावर कार्यरत असलेल्या दोघांना त्यांच्या इच्छित स्थळी बदली हवी होती. त्यांना बदलीचा अधिकार असूनही बदली करण्यास टाळाटाळ केली जात होती. सुरुवातीला, म्हणजे नोव्हेंबर महिन्यात या दोन कर्मचाऱ्यांची बदली करण्यासाठी धाराशिवच्या महावितरण कार्यालयातील एचआर विभागाचा उपव्यवस्थापक, उपकार्यकारी अभियंता कार्यालयातील निम्नस्तर लिपिक, तसेच अधीक्षक अभियंता कार्यालयातील उच्चस्तर लिपिक यांनी तीस हजार रुपये लाच घेतली होती. प्रत्येकाने यातील दहा हजार रुपये वाटून घेतले. नंतर पुन्हा या तिघांनी दोघांकडून आणखी वीस हजार रुपये लाच मागितली. तेव्हा या दोन्ही कर्मचाऱ्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीच्या अनुषंगाने २० व २९ नोव्हेंबर रोजी पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली. यामध्ये एकाने ३० हजार घेऊन अन्य दोघांना दिल्याचे स्पष्ट झाले. तसेच आधी २० हजार रुपयांपैकी ५ हजार रुपये आधीच घेतल्याचेही पंचासमोर आले. यामुळे सापळा रचून बुधवारी दुपारी तिघांनाही ताब्यात घेतल्याचे समजते. पोलिस निरीक्षक विजय वगरे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती असे समजते. लाचखोर अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या घराची तपासणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सुरू केली आहे. तत्पूर्वी तिघांची अंगझडती घेण्यात आली. यामध्ये एकाकडे एक पेन-ड्राइव्ह, हजार रुपये रोख, मोबाईल; दुसऱ्याकडे १४ हजारांचा मोबाईल, ४५०० रुपये रोख; तर तिसऱ्याकडे एक हजार रुपये रोख आणि टायटन कंपनीचे महागडे घड्याळ आढळून आले. त्यांच्या घराची झडती घेत आहे. एच.आर. विभागात उपव्यवस्थापक म्हणून कार्यरत असलेल्यांना दीड लाख रुपये वेतन आहे. एकाला ८० हजार तर तिसऱ्याला एक लाख ५ हजार रुपये वेतन आहे. विशेष म्हणजे, तिघेही बदली प्रकरणांमध्ये रॅकेट चालवत असल्याचे समोर आले येत आहे. ज्यांची बदली करायची आहे, त्यांच्याकडून लाच घेऊनच बदलीची प्रक्रिया केली जाते. जे कर्मचारी लाच देणार नाहीत, त्यांची बदली नियमात असूनही केली जात नाही. असे समजते. अनेकांनी दुर्धर आजारामुळे बदलीसाठी अर्ज केला होता; मात्र त्यांच्या बदल्या नाकारण्यात आल्या. याची उच्चस्तरीय चौकशी करण्याची गरज आहे. असे जनतेत बोलले जात आहे.

# पीएमएफएमई योजना: अन्नप्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी शासनाचे सबसिडीवर मोठे प्रोत्साहन

धाराशिव (जिमाका)- केंद्र शासनाच्या आर्थिक मदतीतून प्रत्येक जिल्ह्यात 'पंतप्रधान सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना (झचत्रझ्वए) राबवली जात आहे.या योजनेमुळे अनेकांना रोजगार मिळत असून कच्च्या मालावर प्रक्रिया करून अधिक नफा मिळविण्याची संधी उपलब्ध होत आहे.

जिल्ह्यात वाढत्या बेरोजगारीच्या पार्श्वभूमीवर शिक्षित युवकांना उद्योग उभारण्यास भांडवलाची अडचण भासत होती. मात्र केंद्र शासनाने सुरू केलेल्या पीएमएफएमई योजनेमुळे उद्योग उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.या योजनेत बेरोजगार, बचत गट,शेतकरी गट,संस्था, तसेच ॲग्रो कंपन्यांनाही अर्ज करता येणार आहे.विशेष म्हणजे,शासन एकूण कर्जावर ३५ टक्के सबसिडी देत आहे,ज्यामुळे जिल्ह्यातील विविध संस्था,गट आणि इच्छुकांना मोठ्या प्रमाणावर मदत मिळत आहे.

जिल्ह्यात प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यात येत आहे.झचत्रझ्वए योजनेअंतर्गत २०२४-२५ व चालू वर्षांत जिल्ह्यात एकूण ४८१ प्रस्ताव मंजूर झाले असून ३८५ उद्योग प्रत्यक्ष सुरू झाले आहेत.यामध्ये खवा,गूळ उद्योग,डाळ उद्योग,बेदाणा,मसाला व पापड यांसारख्या अन्नप्रक्रिया क्षेत्रांचा समावेश आहे.

काय आहे सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना : ही योजना केंद्र सरकारच्या आत्मनिर्भर भारत पॅकेजअंतर्गत राबवली जात आहे.असंघटित व अनोंदणीकृत अन्नप्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी ही योजना असून कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे विविध प्रकारचे उद्योग यात उभारता येतात.

अन्नप्रक्रिया उद्योगासाठी अर्ज कसा करावा : अन्नप्रक्रिया उद्योगामुळे शेतकऱ्यांना आर्थिक उन्नती साधता येते.या उद्योगासाठी शेतकरी,बचत गट,शेतकरी उत्पादक कंपनी आणि संस्था अर्ज करू शकतात.अधिक माहितीसाठी संकेतस्थळ : www.pmfme.mofpi.gov.in

वैयक्तिक अर्जदार,बचत गट,शेतकरी गट,संस्था,ॲग्रो कंपन्या,सात-बारा नसले तरी लाभ मिळू शकतो.

**शासनाकडून मिळणारी मदत :**

प्रत्येक तालुका कृषि अधिकारी कार्यालयात मानधन तत्त्वावर कर्मचारी नेमला आहे.प्रस्ताव दाखल करण्यापासून मंजुरीपर्यंत मोफत मार्गदर्शन उपलब्ध.उद्योग सुरू झाल्यावर शासन ३५ टक्के अनुदान प्रदान करते.अधिक माहितीसाठी आपल्या गावातील कृषि सहाय्यकाची मदत घेता येईल.

आपल्या जिल्ह्यात कच्च्या मालाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असले तरी त्यावर प्रक्रिया करणारे उद्योग तुलनेने कमी आहेत.शासनाची ही योजना ग्रामीण भागातील युवकांसाठी आणि बचत गटांसाठी उत्तम संधी आहे.जास्तीत जास्त नागरिकांनी योजनेचा लाभ घ्यावा.

अधिक माहितीसाठी तालुका कृषि अधिकारी कार्यालय व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय,धाराशिव येथे संपर्क साधावा असे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी राजकुमार मोरे यांनी कळविले आहे.

# गंजेवाडीच्या सुदर्शन जाधव यांना शेतीशास्त्रज्ञ पुरस्कार

तामलवाडी(प्रतिनिधी)-तुळजापूर तालुक्यातील गंजेवाडी येथील प्रयोगशील शेतकरी सुदर्शन शिवाजी जाधव यांनी आपल्या नावीन्यपूर्ण शेतीपद्धती, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि नवनवीन प्रयोगांच्या बळावर राज्यभरात उल्लेखनीय स्थान मिळविले आहे. त्यामुळेच वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांच्या वतीने दिला जाणारा 'शेतीशास्त्रज्ञ पुरस्कार २०२५' या वर्षी जाधव यांना प्राप्त झाला. परभणी येथे गुरुवारी सुवर्ण जयंती रिक्षांत सभागृहात झालेल्या २७ व्या दीक्षांत समारंभात वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ इंद्रमणी साहेब व डॉ मंगला राय ( मा महासंचालक आय. सी.ए. आर. नवी दिल्ली ) यांच्या हस्ते सन्मान चिन्ह व प्रशस्ती पत्र देऊन गौरव केला.

या शेती क्षेत्रातील विशेष योगदान, आधुनिकतेकडे भक्कम वाटचाल आणि कृषी क्षेत्राला दिलेल्या लक्षणीय सहकार्यासाठी त्यांना गौरवण्यात आले. यावेळी संभाजी जाधव ,डॉ व्ही के पाटील , डॉ अशोक धवन ( मा कुलगुरू वनामकृवि ) , डॉ शरद गडाख ( कुलगुरू पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला ) , डॉ विलास खर्चे (कुलगुरू महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी ) , डॉ खिजर बेग ( संचालक संशोधन वनामकृवि ) , डॉ भगवान आसेवार ( संचालक शिक्षण वनामकृवि ) , डॉ राकेश आहीरे ( संचालक विस्तार शिक्षण वनामकृवि ), डॉ. दीपाली सवंडकर यांची उपस्थिती होती.

शेतकरी सुदर्शन जाधव यांनी शेतीत सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब, वैज्ञानिक पद्धतींचा वापर, तसेच नवीन कल्पनांची प्रयोगशील अंमलबजावणी करून संपूर्ण परिसरात शेतीला नवे आयाम दिले आहेत. सेंद्रिय शेती, जलसंधारण, जमिनीच्या आरोग्याचे संवर्धन, पीक बदल, उच्च उत्पादक बियाण्यांचा वापर, आधुनिक सिंचन, तसेच हवामानानुसार शेती नियोजन अशा उपक्रमांमुळे त्यांनी शेतीक्षेत्रात आदर्शवत स्थान निर्माण केले. त्यांच्या शेतात त्यांनी उभारलेले मॉडेल प्लॉट, तंत्रज्ञान प्रात्यक्षिके आणि नवकल्पनांची मांडणी पाहण्यासाठी आजूबाजूच्या गावांतील शेतकरी मोठ्या संख्येने भेट देतात.

# मालमत्ता, ७/१२ वर पती-पत्नीची नावे लावण्याबाबत जाणीव जागृती



उमरगा(प्रतिनिधी)-भारताची देशातील पुरुषप्रधान संस्कृतीचा पगडा आणि महिला सक्षमीकरण चळवळ, लक्ष्मीमुक्ती अभियान अंतर्गत घराच्या ८/अ वर पती-पत्नी यांच्या नावाची नोंद करण्यास लागणारी कागद पत्रे व प्रक्रिया, महिलांचा संपत्ती व मालमत्तेवर अधिकार, शेतीच्या ७/१२ वरती पती-पत्नी संयुक्त मालकीसाठी लागणारी कागदपत्रे व महिलांचे इतर अधिकाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले. स्त्री-पुरुष संयुक्त मालकी हक्क जाणीव अन् जागृती कार्यक्रमात ग्रामपंचायत अधिकारी एस. आर. पांढरे यांनी मार्गदर्शन केले. महिला व बालविकास विभाग अंतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ धाराशिव संचलित ज्ञानदीप लोकसंचलित साधन केंद्र कार्यालयाचे अंतर्गत नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामिण महिला उद्यम विकास प्रकल्पांतर्गत जेंडर व न्युट्रेशन या घटकांतर्गत येळी (ता. उमरगा) येथे स्त्री पुरुष संयुक्त मालकी हक्क जाणीव जागृती कार्यक्रम व माविम मित्र मंडळ व ग्रामपंचायत सदस्य यांची बैठक घेण्यात आली. प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करून बैठकीची सुरुवात करण्यात आली. या वेळी उपसरपंच रामलिंग बिराजदार, ग्रामपंचायत अधिकारी एस. आर. पांढरे, ज्ञानदीप केंद्र सचिव छाया कांबळे, व्यवस्थापक किशोर टोंपे आदी उपस्थित होते. व्यवस्थापक किशोर टोंपे यांनी प्रास्ताविक केले. सखूबाई सोनकांबळे यांनी सूत्रसंचालन केले. नंदा कांबळे यांनी आभार मानले. यासाठी माया कांबळे, पूनम पवार, जयश्री माने, अनीता धनुरे, राणी बनसोडे, माविम मित्र मंडळाचे पांडुरंग अगंबरे, रजनीकांत स्वामी यांनी परिश्रम घेतले.

सहा महिला गटांना रेशीम उद्योग मंजुरीपत्र महिला आर्थिक विकास महामंडळातर्फे राबवण्यात येणारे विविध उपक्रम, नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प व माविम मित्र मंडळ आणि ग्रामपंचायत सदस्य यांच्या विद्यमाने बैठकीचा उद्देश व गावपातळीवर महिला सक्षमीकरण, विविध उपक्रम व विकासकामे यामध्ये माविम मित्र मंडळ यांची भूमिका आणि ग्रामपंचायत सदस्यांच्या योगदानाबाबत माहिती देण्यात आली. या वेळी माविम मित्र मंडळ सदस्य व ग्रामपंचायत सदस्यांमध्ये चर्चा घडवून आणली. लोकसंचलित साधन केंद्राच्या पुढाकार व पाठपुराव्याने येळी येथील महिला, शेतकरी कुटुंबांना तुती लागवड, रेशीम उद्योग व्यवसाय या प्रस्तावांना मंजुरी मिळालेल्या सहा शेतकरी महिलांना मंजुरीपत्राचे वाटप उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# अवैध मद्य विरोधी कारवाई

तामलवाडी(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत गोरख रा. खडकी तांडा ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि.११.१२.२०२५ रोजी खडकी तांड्या कडे जाणारे रोडवर बाभळीचे झाडाखाली अंदाजे २,१०० किंमतीची १८ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये तामलवाडी पो ठाणे येथे गुन्हे नोंदविला आहे.

शिराढोण पोलीस ठाणे अंतर्गत लैलाबाई रा. माळकरंजा ता. कळंब जि. धाराशिव या दि.१०.१२.२०२५ रोजी आपल्या राहत्या पत्र्याचे शेडसमोर अंदाजे ६०० किंमतीची ६ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये शिराढोण पो ठाणे येथे गुन्हे नोंदविला आहे.

आंबी पोलीस ठाणे अंतर्गत अभिमान सुर्यभान जाधव, वय ५० वर्षे, रा. लोणारवाडी ता. परंडा जि. धाराशिव हे दि.११.१२.२०२५ रोजी आपल्या राहत्या घराचे आडोशाला अंदाजे १,३५० किंमतीची १५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये आंबी पो ठाणे येथे गुन्हे नोंदविला आहे.

# २,३२,१५० 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.११डिसेंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २७४ कारवाया करुन २,३२,१५० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.


**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**

**9175325708**


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४


सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649